गुरुवार, ४ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १८
www.ramprahar.com
# रामप्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

आमच्या संयमाचा अंत पाहू नका -आमदार उदय सामंत/२
कर्जतचे गिर्यारोहक निघाले माउंट मून शिखराच्या मोहिमेवर/५
वेटलिफ्टिंगमध्ये विकास ठाकूरला रौप्यपदक/८

## मुख्यमंत्री शिंदे समर्थक आमदारांची सुरक्षा वाढणार



**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील आमदार उदय सामंत यांच्यावरील हल्ल्याची बुधवारी (दि. ३) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत गंभीर दखल घेतली गेली असून मुख्यमंत्री शिंदे यांनी समर्थक आमदारांची सुरक्षा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. तसे निर्देश राज्याच्या पोलीस महासंचालकांना देण्यात आले आहेत. शिवसेनेला पडलेल्या खिंडारानंतर माजी मंत्री व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे राज्याच्या विविध भागांत दौरा करीत आहेत. त्यांच्या निष्ठा यात्रेचा मंगळवारी पुण्यात कार्यक्रम होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक नेतेही पुण्यात होते. ठाकरे यांच्या सभेनंतर शिवसैनिकांनी आमदार सामंतांविरोधात घोषणाबाजी करून त्यांच्या गाडीची काच फोडली तसेच गाडीत बसलेल्या त्यांच्या कार्यकर्त्याला किरकोळ दुखापत झाली. या हल्ल्याची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे.

# महापालिका सदस्य संख्येत सुधारणा

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई तसेच अन्य महापालिकांच्या सदस्य संख्येत सुधारणा करण्याचा निर्णय बुधवारी (दि. ३) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोबत होते.

या निर्णयामुळे मुंबई महापालिकेत सध्याच्या २३६ सदस्यांऐवजी २२७ सदस्य संख्या होईल. त्याचप्रमाणे इतर महापालिकांमध्येही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सदस्य संख्येमध्ये सुधारणा होणार आहे. यानुसार तीन लाखांपेक्षा अधिक व सहा लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ६५ इतकी, तर कमाल संख्या ८५ इतकी असेल. तीन



लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक १५ हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. सहा लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ८५ इतकी, तर कमाल संख्या ११५ इतकी असेल. सहा लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक २० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येणार आहे. **(पान २ वर..)**

### आता जि. प. सदस्यांची संख्या कमीत कमी ५०

जिल्हा परिषद सदस्यांची संख्या कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त ७५ करण्यासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१मध्ये सुधारणा करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सध्या राज्यातील जि.प.मध्ये कमीत कमी ५५ आणि जास्तीत जास्त ८५ अशी सदस्य संख्या आहे. ग्रामीण भागातील घटत चाललेल्या लोकसंख्येमुळे सुधारित सदस्य संख्या करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्वांत कमी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्याला किमान ५० जागा देण्यात येणार आहेत.

## पुणे शिवसेना शहरप्रमुखासह पाच जणांना पोलिसांकडून अटक

**पुणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांच्यावर पुण्यातील कात्रज चौकात झालेल्या हल्लाप्रकरणी शिवसेनाचे शहरप्रमुख संजय मोरे यांच्यासह पाच जणांना पोलिसांनी अटक केली आहे. या सहा आरोपींना बुधवारी (दि. ३) न्यायालयात हजर केले असता त्यांना ६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

शिवसेनेचे युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांची मंगळवारी कात्रज चौकातील सभा झाल्यानंतर तेथून काही कार्यकर्ते जात होते. त्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांची




कार कार्यकर्त्यांना दिसली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी देत गाडीची काच फोडली. याबाबत आमदार सामंत यांनी पोलिसांकडे तक्रार दिल्यावर १५ ते २० जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी रात्रभर छापेमारी करीत शिवसेनेचे हिंगोली संपर्कप्रमुख बबन थोरात, पुणे शहरप्रमुख संजय मोरे, संभाजी थोरवे, राजेश पळसकर, सुरज लोखंडे, चंदन साळुंखे या आरोपींना अटक केली, तर अन्य आरोपींचा शोध सुरू आहे.

आरोपींना बुधवारी न्यायाधीश तापडिया यांच्यासमोर हजर करण्यात आले. युक्तिवादानंतर सर्वांना ६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर आज पुन्हा सुनावणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर बुधवारी (दि. ३) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या संदर्भात गुरुवारी पुढील सुनावणी होणार आहे. कामकाज सुरू झाल्यानंतर ही सुनावणी पहिल्या क्रमांकावर असेल, असे सरन्यायाधीश रमणा यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारमधील १६ आमदारांच्या अपात्रतेच्या कारवाईला आव्हानासह अन्य याचिकांवर बुधवारी सुनावणी झाली. या वेळी शिंदे गटाकडून हरिश साळवे, नीरज किशन कौल आणि महेश जेठमलानी यांनी युक्तिवाद केला, तर ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि



अभिषेक मनु सिंघवी यांनी बाजू मांडली. बंडखोर आमदारांच्या अपात्रतेवरून सुरू झालेली कायदेशीर लढाई आता शिवसेना कोणाची यावर येऊन पोहचली आहे. आजच्या सुनावणीत मूळ पक्ष कोणता, आमदारांची अपात्रता यावर युक्तिवाद झाला. सरन्यायाधीश रमणा यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय पीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान शिवसेनेकडून कपिल सिब्बल यांनी घटनेचा दहाव्या सूचीचा मुद्दा मांडत बंडखोरांनी दुसऱ्या पक्षात विलिन होणे हाच पर्याय असल्याचे म्हटले. त्यावर शिंदे गटाकडून हरिश साळवे यांनी पक्ष सोडला नाही तर पक्षांतर बंदी का, असा सवाल उपस्थित करीत बहुमत गमावलेल्या नेत्यासाठी पक्षांतर बंदी कायदा शस्त्र नाही, असा युक्तिवाद केला. कोर्टाने आज दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर या प्रकरणावर पुढील सुनावणी गुरुवारी ठेवण्यात आली आहे.

## यंग इंडियन कंपनीच्या कार्यालयाला ईडीने ठोकले टाळे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नॅशल हेराल्ड वृत्तपत्राच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी अंमलबजावणी संचालनालय अर्थात ईडीने मोठी कारवाई केली आहे. ईडीने हेराल्ड हाऊस इमारतीतील यंग इंडियन कंपनीच्या कार्यालयाला टाळे ठोकले आहे तसेच पूर्वपरवानगीशिवाय हे कार्यालय खोलू नये, असे निर्देशही ईडीने दिले आहेत.

याआधी या प्रकरणात ईडीकडून काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी तसेच खासदार राहुल गांधी चौकशी करण्यात आली. त्यानंतर आता ईडीने कारवाईचा फास आणखी आवळत यंग इंडियन कंपनीच्या कार्यालयाला टाळे ठोकले आहे.

## बलात्कार पीडितेला धमकावल्याने केदार दिघेंविरोधात गुन्हा दाखल

**ठाणे : प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे यांचे पुतणे आणि नवनियुक्त शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. बलात्कार पीडित तरुणीला धमकावल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

केदार दिघे यांचे मित्र आणि मुख्य आरोपी रोहित कपूर याने २८ जुलै रोजी लोअर परळ येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये एका तरुणीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. आरोपी कपूरने धनादेश देण्यासाठी पीडितेला हॉटेलमध्ये बोलावून तिच्यावर बलात्कार केला, तर याबाबत तक्रार करू नये म्हणून केदार दिघे यांनी तिला धमकाविले, असा आरोप पीडित तरुणीने केला आहे. या प्रकरणी ना. म. जोशी मार्ग पोलिसांनी मुख्य आरोपी रोहित कपूर याच्यासह केदार दिघे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## निवडक

### ‘ईडी’कडून अविनाश भोसले, संजय छाब्रियांची मालमत्ता जप्त

**मुंबई** : येस बँक-डीएचएफएल गैरव्यवहार प्रकरणात पुण्यातील व्यावयासिक अविनाश भोसले आणि बांधकाम व्यावसायिक संजय छाब्रिया यांच्याशी संबंधित एकूण ४१५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) टाच आणली आहे. भोसले यांची १६४ कोटी रुपयांची, तर छाब्रियांची २५१ कोटी रुपयांच्या मालमत्ता ईडीने जप्त केली आहे.

### महाराष्ट्रातील दिग्गज नेते दिल्लीत येणार एका व्यासपीठावर

**नवी दिल्ली** : उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार दिल्लीत एका व्यासपीठावर येणार आहेत. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अधिवेशन दिल्लीत ७ ऑगस्टला होत आहे. या निमित्ताने ही नेतेमंडळी एकत्र दिसणार आहेत.

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# रायगड जिल्ह्यात पुतळे, स्मारकांवर फडकणार तिरंगा

**नागोठणे : प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्याला या वर्षी १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर तिरंगा अभियान सुरू केले आहे. या निमित्ताने रायगड जिल्ह्यात १३ पुतळे व स्मारकांवर तिरंगा ध्वज फडकवला जाणार आहे.

या अभियानांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगी ध्वज फडकाविण्यात येणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत. यासाठी प्रशासकीय



पातळीवर मोठ्या प्रमाणावर तयारी केली जात आहे.

रायगड ही शूरवीर क्रांतिकारकांची भूमी असून त्यांच्या अतुल्य योगदानाची साक्ष देणारी अनेक स्मारके, पुतळे आजही प्रेरणा देत उभे आहेत. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अभियानांतर्गत या पुतळे व स्मारकांवर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनाने साफसफाई, रंगरंगोटी सुरू केली आहे. त्यामुळे पुतळे आणि स्मारकांना नवी झळाळी प्राप्त होणार आहे.

नागरिकांनी स्वातंत्र्याच्या या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळोवेळी केले आहे. त्याला प्रतिसाद मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.

**(अधिक वृत्त पान ७ वर..)**

## उमेश कोल्हे हत्येप्रकरणी आणखी दोघांना अटक

**अमरावती : प्रतिनिधी**

येथील मेडिकल व्यावसायिक उमेश कोल्हे यांच्या हत्येप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकाने बुधवारी (दि. ३) आणखी दोन आरोपींना अटक केली. त्यामुळे या प्रकरणामध्ये आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या नऊवर पोहचली आहे.

मुर्शिद अहमद अब्दूल रशीद (४१, रा. ट्रान्सपोर्ट नगर) आणि अब्दूल अरबाज अ. सलीम (२३, लालखडी), अशी आरोपींची नावे आहेत. हत्याप्रकरणी निधी संकलन करणे आणि इतर आरोपींना आश्रय दिल्याचा आरोप या दोघांवर असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. ‘एनआयए’च्या पथकाने आरोपींची चौकशी सुरू केली असून आरोपींच्या घरांची झडती घेतली जाण्याची शक्यता आहे.

उमेश कोल्हे यांची गेल्या २१ जूनच्या रात्री गळा चिरून हत्या झाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने दुसऱ्या दिवशी दोन आणि त्यानंतर अन्य पाच आरोपींना अटक केली. यानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने या घटनेचा तपास ‘एनआयए’कडे सोपविला होता.

## गणेशोत्सवात शेवटचे पाच दिवस रात्री १२पर्यंत ध्वनिवर्धकाला परवानगी



**पुणे : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या अखेरच्या पाच दिवसांत रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिवर्धकांना परवानगी असेल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. त्यामुळे हौशी भाविकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयात मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील गणेशोत्सव मंडळांची बैठक झाली. या बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पुण्यातील गणेशोत्सव मंडळांना ऐतिहासिक वारसा आहे. राज्यभरातून अनेकजण गणेशोत्सव पाहायला पुण्यात येतात. यंदाच्या गणेशोत्सवाबाबत मंडळांच्या काही मागण्या होत्या. त्याविषयी मंडळाच्या पदाधिकारी यांच्यासोबत बैठक झाली. न्यायालयाच्या नियमांचे पालन करून यंदाचा गणेशोत्सव उत्साहात साजरा करूया.

कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम आपण केले पाहिजे. दगड मारून पळून जाणे ही मर्दुमकी नाही. कोणी कायदा सुव्यवस्था बिघडवण्याचे काम करीत असेल, तर पोलीस त्यांच्यावर नक्कीच कारवाई करतील, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी स्पष्ट केले.

# रोह्यात हळद लागवडीचा प्रयोग

## ५० शेतकऱ्यांकडून पारंपरिक पिकांना पर्याय

**रोहा : प्रतिनिधी**

रोह्यात खरीप हंगामातील भात व नाचणीला पर्याय ठरू शकणाऱ्या हळद लागवडीचा प्रयोग शेतकरी करीत आहेत. तालुक्यात या वर्षी १५ हेक्टरच्या आसपास हळद लागवड करण्यात येत आहे.

रोहा तालुक्यात प्रामुख्याने भात व त्या खालोखाल नाचणी हे पीक घेतले जाते. अलिकडे तालुक्यातील प्रयोगशील शेतकरी आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करून शेतीचे पर्यायी उत्पादन काढत आहेत. त्यातीलच एक पीक म्हणजे हळद.

विशेषतः पश्चिम महाराष्ट्रसह अन्य ठिकाणी हळद लागवड केली जाते. यासाठी पाण्याचे नियोजन महत्त्वाचे असल्याने ठिबक सिंचन करण्यात येते. कोकणात जास्त पाऊस पडत असल्याने खरीप हंगामात ठिबक सिंचनाची आवश्यकता नसते. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाचतो. म्हणूनच हे पीक रोह्यातील पारंपरिक भातशेती व नाचणीपेक्षा फायदेशीर ठरत असल्याने वरकस भागात हळद लागवडीचा प्रयोग केला जात आहे.

रोहा तालुक्यातील वरकस भाग असलेल्या तांबडी, विरझोली, कुडली, सुतारवाडी आदी भागांतील शेतकऱ्यांकडून यंदा हळद लागवड केली जात आहे. तालुक्यात मागच्या वेळी कृषी विभागाच्या ‘आत्मा’मार्फत ४० शेतकऱ्यांना हळद बियाणे देण्यात आले होते. गतवर्षी आठ हेक्टरच्या आसपास हळद लागवड करण्यात आली होती. यंदा कृषी विभागाच्या वतीने ५० शेतकऱ्यांना एकूण साडेदहा टन बियाणे वाटप करण्यात आले आहे.

उत्पादन चांगले निघाल्यास एकरामागे प्रक्रिया न करता ८० ते ९० हजारांच्या आसपास खर्च वजा करता मिळतील, असे तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी सांगितले. आता तालुक्यात हळद प्रक्रिया युनिट एका शेतकऱ्याने आणले असल्याने हळद प्रक्रिया केल्यास यांच्या उत्पादनामागे एकरी एक लाख ते दीड लाखापर्यंत उत्पन्न मिळेल.



(छाया : महादेव सरसंबे)

# भारतीय बॅडमिंटन संघाला रौप्यपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय बॅडमिंटन संघाने रौप्यपदक पटकाविले आहे. बॅडमिंटन मिश्र सांघिक प्रकारातील अंतिम सामन्यात भारताला मलेशियाकडून ३-१ने पराभव स्वीकारावा लागला. यामुळे भारतीय बॅडमिंटन संघाचे सलग दुसऱ्यांदा राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न अधुरे राहिले.


याआधी भारतीय बॅडमिंटन संघाने २०१८च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. दरम्यान, बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या यंदाच्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचे हे १३वे पदक ठरले. या स्पर्धेत भारताने चमकदार कामगिरी करीत विविध क्रीडाप्रकारांत पदके जिंकलीत.

## राष्ट्रकुल स्पर्धा



### वेटलिफ्टर लवप्रीत सिंगला ‘कांस्य’

भारताचा वेटलिफ्टर लवप्रीत सिंगने राष्ट्रकुल स्पर्धेत १०९ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकाविले. त्याने स्नॅच राऊंडमध्ये १६३ किलो आणि क्लीन अॅण्ड जर्कच्या पहिल्याच प्रयत्नात १८५ किलो वजन उचलले. अशा प्रकारे त्याने सामन्यात एकूण ३५५ किलो वजन उचलून वेटलिफ्टिंगमध्ये भारताला नववे पदक मिळवून दिले.




श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं पाझरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. या वेळचं वातावरण अगदी तस्संच आहे. वरुणराजाही दमदार बरसला आहे. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...

श्रावण संपेपर्यंत मान्यवर कवींनी शब्दबद्ध केलेल्या कविता ‘रामप्रहर’मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कवींनी आपली अप्रकाशित कविता छायाचित्रासह ‘रामप्रहर’कडे पाठवावी. त्या कवितेला ‘श्रावणधारा’ या सदराखाली योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल. -मुख्य संपादक

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सअॅप क्रमांक ७७३८१०६००९**

# आमच्या संयमाचा अंत पाहू नका!


## गाडीवरील हल्ल्यानंतर आमदार उदय सामंतांचा सूचक इशारा

**पुणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक आमदार उदय सामंत यांच्या कारवर शिवसैनिकांनी मंगळवारी (दि. २) रात्री कात्रज चौकात हल्ला केला. दगडफेकीत सामंत यांच्या कारची काच फुटली. या हल्ल्यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून आमच्या संयमाचा अंत पाहू नका, असा सूचक इशाराच उदय सामंत यांनी शिवसेनेला दिला आहे.

कात्रज भागात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे एका कार्यक्रमासाठी आले होते. कात्रज भागात शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांची सभा मंगळवारी रात्री पार पाडली. शिंदे यांच्यासह सामंत आले होते. त्यावेळीच हा हल्ला झाला, या हल्ल्यासंदर्भात पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर सामंत यांनी थेट शिवसेनेला इशारा दिला. सामंत यांनी ट्विटरबरोबरच एका खासगी वृत्तवाहिनीशी बोलताना हा इशारा दिला आहे.

सामंत यांनी ट्विटरवरून, गद्दार म्हणता तरी शांत आहे. शिव्या घालता तरी शांत आहे. आई-वडिलांना शिव्या घातल्यात तरी शांत आहे. लोकशाहीत विचार बदलला म्हणून काय ठार माराल? शांत आहे म्हणजे हतबल आणि असाह्य नाही. काळ याला उत्तर आहे. अंत पाहू नका, असे ट्विट केले आहे. या हल्ल्यानंतर आपण पुण्यातील पोलीस आयुक्तांशी चर्चा केली. माझी, माझ्या कारच्या चालकाची आणि खासगी सचिवाची वैद्यकीय चाचणी करण्यात आली आहे, अशी माहिती सामंत यांनी दिली.



***हा भ्याड हल्ला आहे. कायदा सुव्यवस्था पालन करण्याचे काम सरकारचे आणि पोलिसांचे आहे. ज्यांनी हे केले आहे, त्यांच्यावर पोलीस कारवाई करतील, चिथावणी देण्याचे काम कोणी करीत असेल तर पोलीस कायदेशीर कारवाई करतील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे, तसेच आमदारांची सुरक्षा वाढवणार असल्याचा निर्णय बुधवारी (दि. ३) झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मुंबई पोलीस आयुक्त व पोलीस महासंचालकांना या संदर्भात आदेश देण्यात आले.***

सामंत यांनी या वेळी एखाद्याचा विचार पटला नाही, तर ठार मारण्यासारखी टोकाची भूमिका घेणे काही योग्य नाही, असेही म्हटले, तसेच या हल्ल्याच्या निमित्ताने सोज्वळ चेहऱ्यामागे काय चाललेय हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिल्याचा टोलाही सामंत यांनी लगावला. त्या दिवशी दुपारीच मुख्यमंत्री शिंदे यांनी एका कार्यक्रमात कोणीही काहीही बोलले तरी आपण विकासाच्या कामातून उत्तर द्यावे असे म्हटले होते. एकीकडे मुख्यमंत्री अशी भूमिका मांडत असताना दुसरीकडे त्याच दिवशी माझ्यावर हल्ला झाला, असे म्हणत सामंत यांनी टीका केली.

## भाजप राष्ट्रीय विचारधारा मानणारा पक्ष -चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**



भारतीय जनता पक्ष राष्ट्रहीत विचारात घेऊन राजकारण करतो, मात्र विरोधी पक्ष विनाकारण भाजपला विरोध करताना पक्षाची चुकीची प्रतिमा मांडतात. भाजप मुस्लिमविरोधी नसून राष्ट्रीय विचारधारा मानणारा पक्ष आहे, हे पक्षाच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेला सांगण्याची गरज आहे, असे प्रतिपादन भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केले.

भाजप महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्यांक मोर्चाच्या राज्यस्तरीय बैठकीत ते बोलत होते. अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हाजी एजाज देशमुख, राष्ट्रीय उपाध्यक्ष एस एम अक्रम, प्रदेश सचिव जुनैद खान, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पत्रकार सय्यद अकबर, सोशल मीडियाचे साबीर शेख, सलीम बागवान, रशीद शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रात भाजप पुन्हा सत्ताधीन झाली आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढली आहे. पुढच्या अडीच वर्षांत सरकार म्हणून सक्षमपणे काम करतांना पक्षाची राष्ट्रीय प्रतिमा महाराष्ट्रातदेखील बिंबवणे भाजप कार्यकर्त्यांचे कर्तव्य असल्याचे चंद्रकांत पाटील म्हणाले.

अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हाजी एजाज देशमुख यांनी महाराष्ट्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये तसेच इतर महत्त्वाच्या शासकीय योजनांमध्ये अल्पसंख्यांक लोकांना भरघोस मदत केली आहे. त्याबद्दल भाजपच्या अल्पसंख्यांक कार्यकर्त्यांनी सर्वांना माहिती देणे गरजेचे आहे, असे म्हणून सगळ्यांना अल्पसंख्यांक समाजामध्ये पक्षाचे विधायक स्वरूप मांडून विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी जनसंपर्कात राहण्याचे आवाहन केले.

एक दिवसीय बैठकीनंतर भल्यामोठया राष्ट्रीय तिरंगा फडकवण्याचा कार्यक्रम झाला. १५ ऑगस्टपर्यंत सर्वत्र घर घर तिरंगा अभियान यशस्वी कार्यासाठी या वेळी जबाबदाऱ्या देण्यात आल्या.



## भंगाराच्या दुकानात शिरला मालवाहू ट्रेलर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील दिघोडे गावातील रस्त्यालगत असलेल्या भंगाराच्या दुकानात मालवाहू ट्रेलर शिरल्याची घटना मंगळवारी (दि. २) रात्रीच्या सुमारास घडली. या अपघातात भंगाराच्या दुकानातील नागरिक थोडक्यात बचावले आहेत.

सध्या उरण तालुक्यातील गव्हाण फाटा ते चिरनेर आणि खोपटा पूल ते चिरनेर या परिसरात मोठ्या प्रमाणात कंटेनर यार्डचे जाळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे अवजड वाहनांची रेलचेल रात्री-अपरात्री सुरू असते. गव्हाण फाटा रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणारा मालवाहू ट्रेलर हा दिघोडे गावाजवळील रस्त्यालगत असलेल्या भंगाराच्या दुकानात शिरल्याची घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. हा अपघात महात्मा गांधी विद्यालय दिघोडेजवळच घडला. अपघात हा दिवसा घडला असता तर मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असती.

## पनवेल मनपाचे घरोघरी तिरंगा जनजागृती अभियान

**पनवेल : प्रतिनिधी**



पनवेल मनपातर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत नागरिकांचे ऑनलाइन चर्चासत्र व एनएनएसच्या विद्यार्थ्यांमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. कळंबोली येथील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाच्या एनएनएसच्या विद्यार्थ्यांना या अभियानात बुधवारी (दि. ३) सामील करून घेण्यात आले. उपायुक्त विठ्ठल डाके यांनी या अभियानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

या वेळी प्राचार्या मनिषा बनसोडे, एनएसएस विभाग प्रमुख जाधव तसेच एनएनएसचे ३५० विद्यार्थी उपस्थित होते. नागरिकांना या अभियानाची माहिती व्हावी यासाठी एनएसएसचे विद्यार्थी कळंबोली परिसरातील सुमारे साडेतीन हजार घरांना भेट देणार आहेत, तसेच घरोघरी तिरंगा अभियानाची माहिती सांगून, जनजागृती पत्रकांचे वाटप करणार आहेत.

घरोघरी तिरंगा उत्सव नागरिकांनी मोठ्या प्रमाणात साजरा करावा, या उद्देशाने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक, हौसिंग सोयायटी अध्यक्ष, सचिव व कमिटी मेंबर्स, सामाजिक संस्था व बचतगट यांचे नुकतेच गुगलमीटच्या माध्यमातून ऑनलाइन चर्चासत्र झाले. या चर्चासत्रात पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर, कामोठे, पनवेल, कळंबोली भागातील विविध सोसायट्यांमधील नागरिक, सामाजिक संस्था, बचत गट यांचे सदस्यांनी सहभाग घेतला.

उपायुक्त विठ्ठल डाके यांनी १३ ते १५ ऑगस्ट या दरम्यान घरोघरी झेंडा फडकविण्याबाबतचे मार्गदर्शन नागरिकांना केले, तसेच या अभियानासाठी राष्ट्रीय ध्वज उपलब्धतेसाठी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयाशी संपर्क साधावा. नागरिकांनी तिरंगा ध्वजासोबतचा सेल्फी पालिकेच्या फेसबूक अकाउंटला टॅग करण्याबाबत सांगितले.

## खारघर मेट्रो पुलाखालील झोपड्यांवर कारवाईची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १२मधील घरकुलकडून शिवमंदिरकडे जाणाऱ्या मेट्रो पुलाखालील रस्त्यावर कडेला काही फासेपारधी झोपड्या बांधून वास्तव्य करीत आहेत. या अतिक्रमणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. त्यामुळे या झोपड्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

याविषयी खारघर पालिकेचे प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी कारवाई केली जाईल, असे सांगितले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे बुधवारी (दि. ३) मशिन लर्निंग विथ पायथॉन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



दैनंदिन जीवनात आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व समजवण्यासाठी व त्यांचा उपयोग करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. माधव मिश्रा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यशाळेचे आयोजन प्रा. मिनल मांडवे यांनी केले. प्रा. राजेश्री म्हात्रे, प्रा. महेश धायगुडे व प्रा. प्रेरणा सातव तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कार्यशाळेसाठी उपस्थित होते.

यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक महेश्वरी झिरपे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आयोजकांचे कौतुक केले, तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## गव्हाण विद्यालयात क्रांतीसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य प्राप्तीच्या ध्येयाने बेभान झालेला लढवय्या क्रांतीकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांची १२२वी जयंती रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्रीछत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये साजरी करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके होते.



क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन पर्यवेक्षक दीपक भर्णुके व संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी आणि रवींद्र भोईर यांच्या हस्ते झाले. विद्यालयाचे कार्यालयीन लेखनिक चंद्रकांत मढवी, शिक्षक पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, क्रीडाशिक्षक जयराम ठाकूर व अरूणमामा कोळी यांची उपस्थिती या कार्यक्रमास लाभली.

शिक्षणाचा प्रसार, व्यसनमुक्ती व अंधश्रद्धा निर्मूलनसारखे कार्य करून भूमिगत राहून ब्रिटिशांविरुद्ध ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणारे पत्री सरकार अर्थात प्रतिसरकारची स्थापना करणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करताना त्यांच्या जाज्वल्य देशभक्तीने आपण सर्वजण प्रेरित होणे अपेक्षित असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक विभाग सहाय्यक हर्षला पाटील यांनी केले.

### दुखवटा

## अंजनी घरत

**नवी मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या हभप अंजनी नारायण घरत यांचे मंगळवारी (दि. २) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७९ होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून व नातवंडे असा परिवार आहे. अंजनी घरत यांनी राजकीय क्षेत्रात माजी आमदार गणेश नाईक यांच्यासोबत काम केले आहे, तसेच नवी मुंबई बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अॅड. एच. बी. पाटील यांच्या त्या भगिनी आहेत. त्यांच्यावर तुर्भे स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.



### पान १ वरून

## महापालिका सदस्य संख्येत सुधारणा

१२ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ४० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. २४ लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक ५० हजार लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येणार आहे.

३० लाखांपेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एका अतिरिक्त पालिका सदस्याची तरतूद करण्यात येईल. १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या ११५ इतकी, तर कमाल संख्या १५१ इतकी असेल. २४ लाखांपेक्षा अधिक व ३० लाखांपर्यंत लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या १५१, तर कमाल संख्या १६१ असेल. ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या पालिकेत निवडून आलेल्या सदस्यांची किमान संख्या १६१ इतकी, तर कमाल संख्या १७५ इतकी असणार आहे.

## 'इस्रो'च्या ताफ्यात नवे रॉकेट

### येत्या रविवारी होणार पहिले उड्डाण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोच्या ताफ्यात आता नवीन रॉकेट-प्रक्षेपक दाखल होणार आहे.

स्मॉल सॅटेलाईट लॉन्च वेहिकल (एसएसएलव्ही) असे या नव्या प्रक्षेपकाचे नाव असून कमी वजनाचे उपग्रह, ५०० किलोग्रॅमपेक्षा कमी वजनाचे उपग्रह अवकाशात प्रक्षेपित करण्यासाठी या प्रक्षेपकाचा वापर केला जाणार आहे.

हा नवा प्रक्षेपक एका उड्डाणात एकूण ५०० किलो वजनाचे उपग्रह ५०० किलोमीटर उंचीपर्यंत प्रक्षेपित करु शकणार आहे. यामुळे मिनी, मायक्रो आणि नॅनो उपग्रह प्रक्षेपित करणे शक्य होणार आहे.

इस्रोकडे जगातील विविध देश छोटे उपग्रह प्रक्षेपणासाठी सध्या रांगा लावून बसले आहेत. हे छोटे उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी आकाराने मोठा, २९० टन वजनाचा पोलार सॅटेलाईट लॉन्च वेहिकल (पीएसएलव्ही) प्रक्षेपक सज्ज करावा लागतो. इस्रोचा हा भरवशाचा प्रक्षेपक ५०० किलोमीटर उंचीपर्यंत २०००पेक्षा जास्त किलोग्रॅम वजनाचे उपग्रह प्रक्षेपित करु शकतो, मात्र हा प्रक्षेपक सज्ज करण्यासाठी ६०० कर्मचाऱ्यांना काही महिने आधी तयारी करावी लागते. मात्र इस्रोचा अवघ्या १०० टन वजनाचा हा नवा प्रक्षेपक फक्त सहा जणांची टीम अवघ्या सात दिवसांत उपग्रह प्रक्षेपणासाठी सज्ज करु शकते. यामुळे एसएसएलव्ही प्रक्षेपणाच्या माध्यमातून इस्रोची मनुष्यबळ आणि पैशांची मोठी बचत होणार आहे.






पनवेल भाजपतर्फे

जनहितार्थ

माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत

गुरुवार, दि. ४ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

ग्रामीण लसीकरण

■ तक्का ■ तोंडरे ■ नौपाडा ■ आसुडगाव ■ पेठ/रांजणपाडा ■ बेलपाडा विठ्ठल मंदिर

ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# खारघरमध्ये साथरोगांचा प्रादुर्भाव

## स्वाईन फ्ल्यू, हिवताप, डेंग्यूच्या रुग्णांत वाढ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

शहरात स्वाईन फ्ल्यू, हिवताप आणि डेंग्यूच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशातच शहरात सध्या विविध ठिकाणी गढूळ पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे साथीच्या आजारांचे नवे संकट उभे ठाकले आहे.

खारघरमधील घरकुल तसेच सेक्टर १२मधील विसावा, शिवाजी, सामुद्रिका, जागृत, सूर्योदय, शिवसागर या सोसायट्यांना सध्या दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत आहे. याबाबतच्या तक्रारी रहिवाशांनी सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडे केल्या आहेत, मात्र सिडकोने पाण्याची तपासणी केल्यानंतर हे पाणी पिण्यायोग्य असल्याचे सांगितले आहे. या पाण्याला वेगळाच प्रकारचा वास येत असल्यामुळे रहिवासी चिंतेत आहेत. सेक्टर १४ मेट्रो पुलाखाली जलवाहिनी दुरुस्तीच्या मातीमुळे पाणी गढूळ झाल्याचे सिडकोकडून सांगितले जात आहे. त्यामुळे ही समस्या तत्काळ दूर करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे

दहा दिवसांत पाणीटंचाईवर तोडगा खारघरमधील सेक्टर ३४ ते ३६ परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. याबाबत सोसायटीच्या शिष्टमंडळाने सिडकोचे मुख्य अभियंता राजेंद्र धायतकर यांची भेट घेतली होती. या बैठकीत सेक्टर ३४ ते ३६ परिसरात सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी सोसायटीला भेट देऊन पाहणी करून ही समस्या दहा दिवसांत सोडवतील, असे आश्वासन दिले आहे.

**दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडे केली आहे. सिडकोने पाणी तपासणीसाठी पाठविले असता पिण्यायोग्य पाणी असल्याचे सिडकोकडून सांगण्यात आले, मात्र आजही पाण्याला दुर्गंधीयुक्त वास येत असल्यामुळे पाणी उकळून पिण्याची वेळ आली आहे.**
**-रवींद्र पाटील, पदाधिकारी, शिवसागर सोसायटी**

**खारघरमध्ये वाढत असलेल्या डेंग्यू, स्वाईन फ्लूला रोखण्यासाठी पनवेल महापालिकेमार्फत शहरात फवारणी, तसेच अन्य उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी लवकरच निवेदनाद्वारे करणार आहे.**
**-ब्रिजेश पटेल, अध्यक्ष, खारघर मंडल भाजप**



## दुषित पाण्यामुळे रोगराई

**खारघर :** सेक्टर १५ ते १९ परिसरात मलमिश्रित पाणी रस्त्यावर जात असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या मलमिश्रित पाण्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.



सिडकोने खारघर सेक्टर १७ वास्तुविहार गृहनिर्माणशेजारी सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारले आहे. या केंद्रात सेक्टर १५ घरकुल, स्पॅगेटी, वास्तुविहार, सेलिब्रेशन, सेक्टर १८ व १९ परिसरातील सोसायट्यांतील सांडपाण्याचा निचरा होत नसल्यामुळे सोसायटीतील मलमिश्रित पाणी रस्त्यावर येत आहे. या सांडपाण्यामुळे रोगराई पसरण्याची भीती नागरिकांमध्ये आहे.

माजी नगरसेविका संजना समीर कदम यांनी सिडकोचे कार्यकारी अभियंता गिरीश रघुवंशी यांची भेट घेऊन ही समस्या निदर्शनास आणून दिली आहे. सिडकोने यासंदर्भात लवकरात लवकर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.







**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, युवा नेते किशोर पाटील, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत तसेच सुहास भगत यांनी अभिनंदन केले. यासोबतच देशमुख यांचे 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, ग्रामपंचायत सदस्य कामिनी कोळी, उषा देशमुख, सुधीर ठाकूर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, गव्हाण येथील आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अशोक कडू, बाबुराव कांबळे गुरुजी, सदानंद देशमुख आदींनीही अभिनंदन केले. वाय. टी. देशमुख यांच्या पत्नी वैशाली देशमुख सोबत होत्या.**





**उरण : भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील यांचा वाढदिवस आमदार महेश बालदी संपर्क कार्यालयात साजरा करण्यात आला. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष कौशिक शाह, ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत घरत, नगरसेवक नंदकुमार लांबे, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, कामगार नेते जितेंद्र घरत, निलेश पाटील, चंद्रकांत कडू, मुकुंद गावंड, धीरज कोळी यांनी सुनील पाटील यांचे अभीष्टचिंतन केले.**

## सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिराला प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

भारती विद्यापीठ मेडीकव्हर रुग्णालयाद्वारे सीकेटी महाविद्यालयात उलवे, पनवेल परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या वेळी शिक्षक, इतर कर्मचारी तसेच वयोवृध्द मोठ्या संख्येने सहभागी होऊन हदय, रक्तदाब, सांधेधुखी, बीएमआय, नेत्र तपासणी व चष्मे वाटप करून आवश्यक रुग्णांना तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

या वेळी अनेक नागरिकांमध्ये रक्तातील शर्करेचे प्रमाण अति असल्याचे दिसून आले, तर सांधेदुखीचा त्रास तसेच हाडे ठिसूळ झाल्याचे तपासणीअंती आढळून आले. ताण-तणाव आणि बदलती जीवनशैली यामुळे रक्तदाबाचे आजार त्याचप्रमाणे नेत्र तपासणीत नेत्रदोष आणि मोतीबिंदू विकार असल्याचे निदर्शनास आले. या शिबिराच्या आयोजनात सीकेटी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष सहाय्य लाभले.





## कळंबोलीत स्वाध्याय अध्यात्म महिला मंडळातर्फे नागपंचमी

**पनवेल : वार्ताहर**


स्वाध्याय अध्यात्म महिला मंडळातर्फे नागपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. कळंबोली येथील मंदिरात स्वाध्याय अध्यात्म महिला मंडळच्या संचालिका चंद्रकला जायभाये स्वाध्याय परिवाराच्या वतीने महिलांसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या अध्यक्ष विजया कदम यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली. सुमारे साठ ते सत्तर महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली. कोरोना काळ उलटल्यानंतर पहिल्यांदाच महिला एकत्रपणे सण साजरे करत आहेत. महिलांनी झिम्मा, फुगडी, गाणी गाऊन पूर्ण आनंद लुटला.

या वेळी स्वाध्याय अध्यात्म महिला मंडळाच्या संचालिका चंद्रकला जायभाये यांनी या वेळी स्वाध्याय अध्यात्म परिवारास १६ वर्षे पूर्ण झाले असून आतापर्यंत निशुल्क सेवा भावनेच कार्य अविरत चालू राहील, असे सांगितले.



**कळंबोली : नागपंचमीच्या मुहूर्तावर भाजप शहर मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या संपर्क कार्यालयात गोशाळा दानपेटी सुरू करण्यात आली आहे. पशुप्रेमी रायसाहेब यांनी पाच हजार रुपये या दानपेटीत टाकून या कार्याचा प्रारंभ केला. जर कोणास गाईसाठी चारा व गोशाळेला दान करायचे असेल, तर माझ्या संपर्क कार्यालयामध्ये दानपेटी ठेवलेली आहे, तेथे येऊन दान करावे, असे आवाहन पाटील यांनी केले आहे.**



## रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये मुलाखती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात कौशल्य विकास कक्ष व सॅमसंग कंपनीच्या संयुक्त विद्यमाने मुलाखती बुधवारी (दि. ३) घेण्यात आल्या. या मुलाखतीचे आयोजन कौशल्य विकास कक्षाने केल होते.

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने मुलाखतीमधे विचारलेल्या प्रश्नाचे अचूक उत्तरे दिली. सॅमसंग कंपनीच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व कंपनीविषयी माहिती दिली. या मुलाखतीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षाच्या समन्वयक महेश्वरी झिरपे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या मुलाखतीचे आयोजन प्रा. रूपाली नगारेकर यांनी केले. (समन्वयक, कौशल्य विकास कक्ष) तसेच प्रा. मिनल माडवे, प्रा. महादेव चव्हाण यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी मुलाखतीचे यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.



**पनवेल : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त न्हावा-शेवा पोलीस ठाण्यातर्फे आरोग्य शिबिराचे आयोजन गव्हाण ग्रामपंचायत सभागृहात करण्यात आले होते. या वेळी एसीपी शिरसाट, एसपीआय भटे, एपीआय शिंदे, सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत आणि सदस्य, सुधीर ठाकूर, राजू कोळी, के. डी. कोळी आदी उपस्थित होते. या शिबिरास प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी अस्मिता बोंबट्टकर यांचे सहकार्य लाभले.**

## भाताण येथे कोरोना लसीकरण कॅम्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाताण येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, अजिवली, जिवीका हेल्थ केअर, मुंबई व अमेटी विद्यापीठ, भाताण यांच्या संयुक्त विद्यमाने कोरोना लसीकरण कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १७८ नागरिकांनी लाभ घेतला.



या वेळी अमेटी विद्यापीठाचे ॲडमिनिस्ट्रेशन सुदीप मेहता, हॉस्टेल ॲण्ड सेक्युरिटी डायरेक्टर शरणजित सिंग, ॲडमिन रिप्रेजेन्टिटिव्ह संजय सिंग, असिस्टन्ट डायरेक्टर केतन मुकादम, अशोक कुमार, जिवीका हेल्थ केअरचे मेडिकल सोशल वर्कर अमित पवार, डीआयओ अक्षय पाटील आदी उपस्थित होते.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती उर्जा कंपनी सरकारी मालकीची नाही?**
***अ.*** एनटीपीसी ***आ.*** पॉवर ग्रीड ***इ.*** गेल ***ई.*** टाटा पॉवर

**२. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**
***अ.*** गृह कर्ज ***आ.*** कारवरील कर्ज
***इ.*** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज ***ई.*** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**३. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**
***अ.*** नटराजन चंद्रशेखरन ***आ.*** राकेश झुनझुनवाला ***इ.*** रमेश दमाणी ***ई.*** नंदन निलकेणी




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# तैवानचा तिढा

तैवानवरून अमेरिकेने आशियातील आग्या माशांच्या मोहोळावरच दगड मारला आहे हे खरेच. त्याची झळ तैवानला लागेलच. परंतु चीनच्या अन्य शेजाऱ्यांनाही त्याची किंमत कदाचित मोजावी लागू शकेल. वास्तविक सध्याचा काळ हा कोविडोत्तर पुनर्उभारणीचा काळ मानला जातो. आर्थिक प्रगतीची चिंता करण्याऐवजी युद्धाची खुमखुमी जिरवण्याचे हे उद्योग परिस्थिती चिघळवणारे ठरू शकतात. तैवानचा तिढा त्यामुळेच जगाची चिंता वाढवणारा ठरतो. पलोसी यांच्या तैवानभेटीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारण कुठल्या दिशेने जाते हे बघण्यासारखे ठरेल.

**अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये 'जागतिक पोलीस' म्हणून स्वत:ची प्रतिमा पुन्हा ठसवण्याच्या दृष्टीने अमेरिकेने आपल्या हालचाली सुरू केल्या आहेत. असली पोलिसगिरी करण्याचा अधिकार खरे तर अमेरिकेला कोणीही दिलेला नाही. पण समृद्धी आणि लष्करी ताकदीच्या बळावर सर्वत्र दादागिरी करण्याचा हेका अमेरिका कधीही सोडत नाही. तसेच अशी संधी दिसल्यास ती कधी दवडत नाही. युक्रेनच्या सत्ताधाऱ्यांना नाटोमध्ये आणण्याची खटपट करून अमेरिकेने रशियाला डिवचले. अफगाणिस्तानातून अंग काढून घेताना त्या देशाच्या दुरावस्थेकडे ढुंकूनही पाहिले नाही. अफगाणिस्तानातील प्रदीर्घ आणि बव्हंशी अपयशी युद्ध मोहिमेचा साफ विसर अमेरिकेला पडला आहे. अन्यथा अल जवाहिरी या अतिरेक्याचा ड्रोन हल्ला करून खात्मा केल्याची फुशारकी अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी मारली नसती. हे सगळे कमी पडले म्हणून की काय अमेरिकेने आता चिनी ड्रॅगनच्या शेपटावर पाय देण्याची उठाठेव केली आहे. डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेत्या आणि अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या अध्यक्षा नॅन्सी पलोसी यांनी चीनला न जुमानता शेजारच्या तैवानला भेट दिली. चीनच्या मुख्य भूमीपासून शंभरएक मैलावर असलेल्या तैवान या समुद्री बेटावरून अनेकदा जागतिक तणाव निर्माण झाला आहे. पलोसी यांच्या तैवान भेटीमुळे चीनने केलेला थयथयाट अपेक्षितच म्हटला पाहिजे. पलोसी यांच्या तैवान भेटीचे गंभीर परिणाम होतील असा कडक इशारा चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी दिला होता. तरीही हा दौरा पार पडला. यामुळे खवळलेल्या चीनने आर्थिक निर्बंधांपासून लष्करी संचलनापर्यंत हरप्रकारे आपला संताप व्यक्त केला. गेल्या काही वर्षांत चीनने आपले नाविक सामर्थ्य प्रचंड प्रमाणात वाढवलेले आहे. तैवान नजीकच्या समुद्रात युद्धनौकांचा सराव आणि आकाशात युद्ध विमानांचे आक्रस्ताळी संचलन असले प्रकारही चिनी सत्ताधाऱ्यांनी करून दाखवले. तरीही ना चिमुकले तैवान झुकले, ना अमेरिकेने आपला दौरा थांबवला. एक प्रकारे चीनला वाकुल्या दाखवण्याचाच हा प्रयत्न आहे असे म्हणता येते. तैवान हा अवघ्या सव्वा दोन कोटी लोकसंख्येचा देश म्हणजे चीनचाच फुटून निघालेला एक भाग असल्याची भूमिका चिनी सत्ताधारी घेत आले आहेत. चीनमधील कम्युनिस्ट राजवट पोलादी समजली जात होती, त्या काळापासून तैवानला स्वातंत्र्य देण्याचा विचार त्यांच्या मनात कधीही आला नाही. आता तर तैवानमध्ये रीतसर लोकशाही व्यवस्था नांदू लागली आहे. चीनसारख्या महाबली शेजाऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवून तैवानी लोकशाही तग धरून आहे. याच लोकशाहीच्या रक्षणाचा धागा पकडून अमेरिकेने तेथे हस्तक्षेप केला आहे. अर्थात अमेरिकेची लोकशाहीबाबत असलेली अतिरेकी आपुलकीची भावना तितकीशी पवित्र मानता येणार नाही. ऊठसूट लोकशाहीचे गळे काढणाऱ्या अमेरिकेने अनेक लष्करशहा आणि हुकुमशहांना बेधडक मदत केली आहे. तो इतिहास काही फार जुना नव्हे.**

# अळूची लागवड ठरू शकते ग्रामीण उत्पन्नाचे स्त्रोत

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्याच्या ग्रामीण भागांतून शहरात दूधाचे उकाडे (पुरवठा) घालणारे शेतकरी आपआपल्या ग्राहकांना श्रावणात उपवास सोडतानाच्या जेवणातील अळूच्या वड्यांची पाने तसेच उपवासासाठी उकडलेले कंद आणि भाद्रपदातील पितृपक्षामध्ये गरगटे म्हणजेच फदफदे ही ओलीभाजी मिळावी म्हणून घरांच्या कुंपण-बांधांवर अळूच्या वड्यांच्या पानांचे पीक घेताहेत. मात्र, पिढ्यान्‌पिढया ही स्नेहभावाची परंपरा जोपासणाऱ्या या ग्रामीण शेतकऱ्यांनी याकडे अद्याप व्यावसायिक दृष्टीकोनातून न पाहिल्याने हे पीक अद्याप उत्पन्नाचे आजही स्त्रोत ठरलेले नाही.

करड्या रंगाच्या अन् उभट कर्दळाच्या कंदासारख्या असणाऱ्या कंदापासून लागवड करण्यात येणारे अळू हे भाजीवर्गीय पीक असून बारमाही घेता येते. पोलादपूर तालुक्यातील खेडेगावांमध्ये साधारणत: प्रत्येक घराच्या परस अंगणामध्ये सांडपाण्याच्या ठिकाणी किंवा न्हाणीच्या जागेमध्येही याची लागवड चांगल्याप्रकारे होत असते. दलदलीच्या ठिकाणी पाण्याच्या डबक्याजवळही हे अळूच्या पानांचे पीक चांगल्याप्रकारे वाढते. त्याचप्रमाणे साबणाचे, सांडपाण्याचे पाणी हे स्वच्छ केले जाऊन याचा वापर अळू पिकासाठी चांगल्याप्रकारे वाढीसाठी करून घेतल्यास उपयुक्त ठरत असतो. डबक्याच्या ठिकाणी याची लागवड केल्यास डासांचा प्रादुर्भावही कमी होत असल्याचाही चांगला अनुभव ग्रामस्थांकडून सांगितला जात आहे.


अळूचे कंद, पाने आणि देठ यांचा उपयोग भाजीसाठी केला जातो. अळूच्या पानांपासून वड्या आणि भजी तयार करतात. लग्न समारंभामध्ये मसालेभाताबरोबर अळूमध्ये मुळा, शेंगदाणा, गूळ, चिंच टाकून केलेली भाजी खाणे प्रचलित आहे. पुण्यासारख्या शहरामध्ये पेशवाईच्या काळात अळूशिवाय पक्वान्नाचे जेवण पूर्ण होत नसे. पितृपंधरवड्यामध्ये हॉटेल्समध्येही अळूची भाजी, अळूची वडी नाविन्यपूर्ण म्हणून विक्रीस उपलब्ध असते तर लग्नामध्ये आवर्जून आहारामध्ये वापरली जाते. अळूच्या कंदांपासून चिप्स तयार करता येतात. ज्या उपवासालादेखील कंद म्हणून उपयुक्त ठरतात. अळूची पाने आणि कंद ही दोन्ही आहारदृष्ट्या पौष्टिक आहेत. अळूची पाने आणि कंद यामध्ये कार्बोहायड्रेटस, फॅटस, खनिजे तसेच जीवनसत्त्व 'अ' आणि 'ब' भरपूर प्रमाणात असते. अळूची पाने आणि कंद यामध्ये असलेल्या विशिष्ट्य द्रव्यांमुळे अळू खाताना घसा खवखवतो, परंतु अळू शिजविताना चिंच व गुळाचा वापर केल्यास ही द्रव्ये कमी होतात. त्यामुळे घसा खवखवण्याचे प्रमाण कमी होते.

गुजरातमध्ये सकाळचा नाष्ट्यात ढोकळा, भावनगरी आणि अळूची वडी असे पदार्थ हमखास ठरलेले आहे. बरेच गुजराती अमेरिकेमध्ये न्यूजर्सी येथे स्थायिक झाले आहेत. न्यूजर्सीमध्ये वावरताना आपण पुण्याच्या ट्रॅफिकमध्ये आहोत असे वाटते. अमेरिकेतील न्यूजर्सी शहरामधील भारतीयांच्या या दैनंदिन गरजा पुरविण्यासाठीच्या दुकान, हॉटेलांत अळूच्या उकडून केलेल्या वड्या हवा बंद डब्यातून मिळतात. त्या वड्यांना अमेरिकेत पात्रा म्हणतात. त्या पात्रा वड्यांना घरी तव्यावर ताबडतोब परतून न्याहरीत खाता येतात. जपान, थायलंड, मलेशिया, ऑस्ट्रेलिया या पुर्वे कडील देशात तसेच युरोप, अमेरिकेत भारतीय लोक मोठ्या प्रमाणात नोकरी व्यवसायामध्ये स्थलांतरीत झाले असून ते सर्व मित्रमंडळींसोबत मोठ्या चवीने हा पदार्थ खातात.

सतमुखी, श्रीरश्मी, श्रीपल्लवी, आस्वाद असे व्यावसायिक पीक घेण्यासाठी अळूचे कंद निर्माण करण्यात आले असले तरी महाराष्ट्रात काळ्या देठाचे आणि मध्यम आकाराच्या पानांचेच सर्वसाधारण पीक घेतले जात आहे. स्वादिष्ट अळूमध्ये मात्र ऑक्झेलेट, रॅफाईडस हे द्रव्य कमी प्रमाणात असल्यामुळे याची भाजी खाताना घसा खवखवत नाही, असा अनेकांचा अनुभव आहे. अळूचे कंद आणि पाने यातील प्रोटीन्समुळे कोणत्याही प्रकारची ॲलर्जी होत नसल्यामुळे बनविलेले अन्नपदार्थ लहान मुले, आजारी आणि अशक्त माणसांसाठी ही उपयुक्त आहेत. मात्र, अगदीच तुरळक प्रमाणात काही शेतकरी १० रूपयांना ३ किंवा ५ पानांची जुडी करून विक्री करीत असले तरी अद्याप उत्पन्नवाढीचा स्त्रोत म्हणून या अळूच्या पानांच्या पिकाकडे गांभिर्याने पाहिले जात नसल्याने स्नेहभावाचीच परंपरा छानपैकी जोपासली जात आहे.

बाकरवडीची लज्जत सर्वतोमुखी करणाऱ्या पुणे शहराच्या खाद्यसंस्कृतीसमोर पेशवाईच्या काळात आवर्जून खाल्ली जाणारी अळूची पाने अथवा अळूच्या देठांच्या फदफदेसारख्या खाद्यपदार्थांचे विस्मरण होणे शक्य नाही. यास्तव कोकणासह पश्चिम महाराष्ट्राने अळूवडी आणि अन्य पारंपरिक पदार्थांद्वारे महाराष्ट्रीयांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सामाजिक स्तरावर प्रयत्न होण्याची गरज आहे. अळूची पाने व कंद यांच्या अधिकाधिक लागवडीसह सर्वत्र उपलब्धतेसाठी प्रयत्न झाल्यास कार्बोहायड्रेटस, फॅटस, खनिजे तसेच जीवनसत्त्व 'अ' आणि 'ब' आहारातून प्राप्त होईल, असे आरोग्यदायी पाककृतीचे महत्त्व वाढीस लागून निरोगी समाज निर्मितीदेखील साध्य होणार आहे. दरम्यान या अळू भाजीकडे उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून बघणे गरजेचे आहे.





## बदलते तंत्रज्ञान

## जीमेलवरील अनावश्यक मेल डिलीट करण्यासाठी विशेष फिचर

आपण आज अशी एक जबरदस्त ट्रिक जाणून घेणार आहोत, जिच्या मदतीने तुमच्या जीमेल अकाउंटवर येणारे सर्व अनावश्यक मेल आपोआप डिलीट होतील. काहीवेळा निरुपयोगी मेलमुळे आपले कामाचे पाहायचे राहून जाते. जीमेल हा एक अतिशय लोकप्रिय प्लॅटफॉर्म आहे. कोणत्याही ॲपमध्ये प्रवेश करण्यासाठी, आपल्याला त्यात आपला ईमेल आयडी प्रविष्ट करावा लागतो. आता बहुतेक लोक जीमेल वापरतात. त्यामुळे आपल्याला अनेक प्रकारचे मेल येणे साहजिक आहे. वर्क मेल्स व्यतिरिक्त, स्पॅम मेल्स जीमेलवर वर खूप जागा घेतात आणि काहीवेळा त्या निरुपयोगी मेलमुळे आपले कामाचे पाहायचे राहून जातात. पण या मेल्समुळे आपले जीमेल स्टोरेज भरून जाते. आज अशी एक जबरदस्त ट्रिक जाणून घेणार आहोत, जिच्या मदतीने तुमच्या जीमेल अकाउंटवर येणारे सर्व अनावश्यक मेल आपोआप डिलीट होतील.

आता जीमेलवरील हे अनावश्यक मेल्स आपोआप कसे डिलीट होणार असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण हे शक्य आहे. यासंबंधीची ट्रिक आज आपण जाणून घेऊया. नको असलेले मेल्स आपोआप डिलीट करण्यासाठी, जीमेल तुम्हाला फिल्टर्स फॉर ऑटो डिलीट हे विशेष फीचर देते. हे फीचर कसे वापरायचे ते जाणून घेऊया. सर्व प्रथम तुमचे जीमेल अकाउंट उघडा. आता सर्च बारमध्ये तुम्हाला 'फिल्टर' पर्याय दिसेल. जर तुम्हाला सर्च बारमध्ये हा पर्याय दिसत नसेल, तर तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. तुम्हाला हा पर्याय सेटिंग्जमध्ये, 'फिल्टर्स आणि ब्लॉक ॲड्रेस' च्या टॅबमध्ये सापडेल. यामध्ये तुम्हाला फिल्टर तयार करा वर क्लिक करावे लागेल.

'फिल्टर' पर्यायावर क्लिक केल्यानंतर, तुम्हाला सर्वात वर फ ार्म लिहिलेले दिसेल. तुम्हाला हटवायचे असलेल्या ईमेलचे फक्त नाव किंवा ईमेल ॲड्रेस येथे टाइप करा. अशा प्रकारे, तुम्हाला नको असलेले मेल ॲड्रेस निवडले जातील आणि ते डिलीट होतील. दरम्यान जीमेलचा सरहास वापर होत असताना त्याची बारकावेही तेवढेच माहित असणे गरजेचे आहे. बऱ्याच जणांना याबाबत माहिती नसते. माहितीअभावी महत्त्वाचे मेल मागे पडत जातात आणि नवीन नवीन मेल येत राहतात. यामुळे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# प्रतिभावंत साहित्यिक ना. सी. फडके

**निमित्त**



ना. सी. फडके यांचा जन्म ४ ऑगस्ट १८९४ मध्ये झाला. फडके यांचे नाव उच्चारताच आपल्याला केवळ एक व्यक्ती नव्हे तर एक कालखंड आठवतो. त्यांना ८४ वर्षांचे म्हणजे तसे दीर्घ आयुष्य लाभलेले यामुळे अलीकडच्या वाचकांनासुद्धा फडके चांगले माहीत आहेत.

लेखक म्हणूनच त्यांची प्रतिमा आपल्या अधिक परिचयाची असली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते, अनेक रंग होते तसे अनेक ढंगही होते. तसे पाहिले तर फडके हे स्वयंभू लेखक होते. त्यांच्यावर हरिभाऊ किंवा नाट्याचार्य खाडिलकर यांचा थोडाफार परिणाम झाला असेल, पण त्यांना कुणी गुरू नव्हते. त्यांचे अनुकरण करणारे काही लेखक होते आणि आहेतही, पण त्यांना कुणी शिष्य नाही. फडके लेखक म्हणून स्वतःच घडले. स्वतःतच रमले आणि आपण म्हणू तेच खरे असे मानत राहिले. ते मराठी माणूस म्हणूनच जगले तरी इतर बहुतेक लेखकांपेक्षा ते फार वेगळे होते. इंग्रजी भाषा त्यांना वश होती आणि त्यांच्या नावावर बरेच इंग्रजी लेखन आहे. पण फडके हे ओळखले जातात ते मराठी लेखक म्हणूनच. व्यवसायाने ते प्राध्यापक होते, तेही तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र या विषयांचे. अशा विषयांचे प्राध्यापक सहसा ललित लेखनाकडे वळत नाहीत. मात्र फडके वळले एवढेच नव्हे तर त्यांनी या क्षेत्रात हेवा करावा असे यश संपादन केले.

सुरुवातीच्या काळात नोकरीच्या निमित्ताने फडके यांनी थोडीफार भ्रमंती केली. १९२१च्या असहकाराच्या चळवळीत ते सामील झाले होते, पण हा आपला मार्ग नव्हे, हे त्यांच्या लगेच लक्षात आले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये संधी मिळताच त्यांनी प्राध्यापकाचा रस्ता धरला. एक विद्यार्थिप्रिय कुशल प्राध्यापक म्हणून ते रुबाबात वाटचाल करीत राहिले. कठीण विषय सोपा करून सांगण्याचे त्यांचे कौशल्य आणि सफाईदार इंग्रजी वक्तृत्व याबद्दलच्या आठवणीत रमणारे त्यांचे विद्यार्थी आजही आढळतात. एकाच वेळी फडके आणि माधव जुलियन हे दोन मोठे लेखक राजाराम कॉलेजमध्ये होते, पण त्यांच्या स्वभावात आणि वागण्या-बोलण्यात फार अंतर होते. संस्थानी राजवटीची काही बंधनेही होती. पण फडके यांनी त्या वातावरणाशी जमवून घेतले. खेळ, संगीत, नाटक यांना कोल्हापुरात फार वाव होता. सगळ्याची आवड फडके यांनी जोपासली. देवल क्लबमुळे नामांकित गायक-गायिकांच्या मैफिलींचा आनंद त्यांना मनसोक्त लुटता आला. एक अभिजात रसिक म्हणून फडके यांची प्रतिमा त्यातूनच निर्माण झाली. ही रसिकता स्वतःपुरतीच न ठेवता आस्वादक लेखांच्या द्वारा ललितकलांची आवड सामान्य वाचकांपर्यंत पोचविण्याचे काम त्यांनी सातत्याने केले.

चित्र, शिल्प, नाट्य, नृत्य, संगीत या ललितकलांचा आस्वाद घेऊन आपले जीवन समृद्ध आणि संपन्न केले पाहिजे ही जाणीव फडके यांनी मराठी माणसांना करून दिली. त्यासाठी सतत आस्वादक वृत्तीने मैफिली, कलावंत आणि खेळांचे सामने यांची वर्णने ते करीत राहिले. देशभक्ती आणि ध्येयवाद यापायी कळकट जीवनपद्धतीचा (म्हणजेच साधी राहणी) बोलबाला असण्याच्या काळात फडके यांनी जीवनाचा सर्वांगांनी आणि रसिकतेने आस्वाद या मताचा आग्रह धरला. स्वतः ते तसे वागत राहिले. त्यांचे निधन २२ ऑक्टोबर १९७८ ला पुणे येथे झाले.

**-गं. ना. जोगळेकर**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : बहीण-भावाचे अतुट नाते वृद्धींगत करणारा म्हणजे रक्षाबंधन सण होय. हा सण अवघ्या आठ दिवसांवर आल्याने बहिणींची खरेदीसाठी लगबग वाढली आहे. आपल्या भावासाठी राखी खरेदी करताना एका बहिणीचे टिपलेले हे छायाचित्र.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आरोग्य प्रहर

## आजारांना दूर ठेवण्यासाठी अंगिकारा 'या' सवयी!

जर तुमची प्रतिकारशक्ती मजबूत असेल, तर अनेक आजारही दूर होतात, तर ती मजबूत करण्यासाठी संतुलित आहारासोबतच काही सवयी अंगीकारणे आवश्यक आहे. या सवयी तुम्हाला दीर्घकाळ निरोगी ठेवतील. रोज सकाळी 'ही' कामे करा, अनेक आजार जवळ येणारदेखील नाहीत.



गेल्या दोन वर्षांपासून लोक रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याविषयी बोलत आहेत. अनेक कंपन्या त्यांच्या उत्पादनांद्वारे प्रतिकारशक्ती वाढवण्याचा दावा करत असताना, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारा डेकोक्शन पिण्याचा सल्ला घेणेदेखील सामान्य झाले आहे. या उपायांचा अवलंब करण्यात काहीही नुकसान नाही, परंतु आम्ही तुम्हाला असे काही नैसर्गिक उपाय सांगणार आहोत, जाणून घ्या या विषयी.

**रोज सकाळी चाला-** आपण सर्वजण लहानपणापासून हे ऐकत आलो आहोत की, सकाळी मोकळ्या हवेत फिरणे ही एक चांगली सवय आहे. सकाळी लवकर शुद्ध हवेत चालल्याने हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब यासारख्या समस्यांपासून वाचू शकतो, असेही डॉक्टर सांगतात. याव्यतिरिक्त, सकाळी नियमित चालल्याने आपल्या शरीराची प्रतिकारशक्ती सुधारते.

**किमान एक तास व्यायाम करा-** दररोज सकाळी किमान एक तास व्यायाम किंवा योगासने करा. कारण डॉक्टर म्हणतात की, सकाळी लवकर घाम आल्याने शरीरातील सर्व विषारी घटक बाहेर पडतात आणि शरीर निरोगी होते. योग आणि व्यायामामुळे आपले शरीर केवळ मजबूत होत नाही तर ते मानसिक आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. दररोज व्यायाम केल्याने आपले स्नायू आणि हाडे आणि फुफ्फुसे मजबूत होतात.

**मधासह लिंबूपाणी प्या-** लिंबू नैसर्गिकरित्या व्हिटॅमिन सी समृद्ध आहे आणि मध नैसर्गिक साखर, अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे यांचा चांगला स्त्रोत आहे. त्यांचे मिश्रण तयार करून सकाळी प्यायल्याने शरीरातील घाण निघून जाते. त्यामुळे लठ्ठपणा कमी होतो आणि किडनीही स्वच्छ होते. याशिवाय रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत करते. लिंबू-मधामुळे तुम्हाला फ्रेश वाटते. आपल्या दैनंदिन दिनचर्येत याचा समावेश करणे आपल्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

**योग्य न्याहारी करा-** जर तुम्ही अशा लोकांपैकी असाल ज्यांच्यासाठी सकाळी फक्त एक कप चहा पुरेसा आहे, तर निरोगी राहण्यासाठी ही सवय बदला. न्याहारी हे दिवसभरातील सर्वात महत्त्वाचे जेवण आहे, हे लक्षात ठेवा की ते शरीराला दिवसभर काम करण्यासाठी ऊर्जा देते. त्याचबरोबर रोगप्रतिकारक शक्तीही चांगली राहते.

# मुरूड तालुक्यात पावसाची दांडी

## भात पीक पिवळे पडण्यास सुरुवात



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात जुलै महिन्यात कोसळलेल्या पावसाने मागील पंधरा दिवसांपासून दांडी मारली असून कडक ऊन पडू लागले आहे. त्यामुळे उकाडा वाढला असून भात पीक पिवळे पडू लागल्याने मुरूड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

मुरूड तालुक्यात ३९०० हेक्टर क्षेत्रात भात पीक घेतले जाते. मागील वर्षी तालुक्यात २८०० मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला होता. यंदा आतापर्यंत १३४०मिलीमीटर एवढाच पाऊस झाला आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीस पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे मुरूड तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांनी भात लावणी पूर्ण केली होती. १३ ते २७ जुलै या कालावधीत जेमतेम १९५मिलीमीटर पाऊस पडला. २८ जुलै ते ३ऑगस्टपर्यंत फक्त १० मिलीमीटर एवढाच पाऊस झाल्याने आता शेतांमधील पाणी सुकून गेले आहे. शेती कोरडी दिसू लागली आहे.सध्या वातावरणात उकाडा निर्माण झाला आहे. कडक उन्हाचा परिणाम भात पिकावर होऊन काही ठिकाणी पिके पिवळी पडू लागली आहेत. पावसाने पाठ फिरवल्यामुळे मुरूड तालुक्यातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यांचे डोळे आता आकाशाकडे लागले आहेत.

**मागील काही दिवसांपासून कडक उन पडत असल्याने पाणथळ जमिनी सुकू लागल्या आहेत, काही ठिकाणी जमिनीला भेगासुद्धा पडल्या आहेत. उन्हामुळे भात पिकांवर रोगाचा प्रार्दूभाव वाढला असून औषध फवारणीसाठी कृषी विभागाकडून मदत मिळावी.**

**–मनोज कमाने, शेतकरी,**

# कर्जतचे गिर्यारोहक निघाले माउंट मून शिखराच्या मोहिमेवर

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कर्जत शहरातील गिर्यारोहकांनी २३४०९ फूट उंचीवरील माउंट मून या शिखरावर जाण्याची मोहीम आखली आहे. या मोहिमेवर निघालेल्या गिर्यारोहकांना शुभेच्छा देण्यात आल्या. कर्जत नगरपालिकेकडून या गिर्यारोहकांना माउंट मून येथे फडकवण्यासाठी भारताचा तिरंगा ध्वज भेट देण्यात आला.

कर्जत शहरातील गिर्यारोहक संतोष दगडे, संदीप मोकाशी, हेमंत जाधव, धनाजी जाधव हे स्वातंत्र्याचा ७५वा वर्धापनदिन आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करणार आहेत. या गिर्यारोहकांनी हिमालयातील माउंट मून हे शिखर सर करण्याची मोहीम आखली आहे. समुद्र सपाटीपासून २३,४०९फुट उंचीवर हे शिखर सर करण्यासाठी हे गिर्यारोहक कर्जत येथून निघाले आहेत. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कर्जत नगर परिषद कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मुख्याधिकारी सुरेखा भणगे, नगरसेवक बळवंत घुमरे, पालिकेचे लेखापाल गोसावी, स्वच्छता निरीक्षक सुदाम म्हसे, रवींद्र लाड, कर्जत हायकर्स संस्थेचे अध्यक्ष विकास चित्ते, उपाध्यक्ष महेंद्र कर्वे आदी उपस्थित होते.



# अलिबागमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी संयुक्त बैठक

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी अलिबाग नगर परिषद प्रशासन आणि पोलीस संयुक्त कारवाई करणार आहेत. अलिबाग पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

अलिबाग शहरात दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढते आहे. रस्त्याच्या दुतर्फा फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. बेशिस्तपणे पार्किंग केल्यामुळेही वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. शहरातील जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा रुग्णालय, जिल्हा न्यायालय, कन्या शाळा, सेंट मेरी शाळा या परिसरात बेशिस्त वाहन पार्किंगमुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. शहरातील महावीर चौक ते आंबेडकर पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात फेरीवाले रस्ता अडवून बसतात, त्यामुळेही वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. बेशिस्त रिक्षाचालकांमुळे अशोका कॉम्प्लेक्स परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होते. बस स्थानक परिसरात पादपथावर फुलवाले अतिक्रमण करून बसले आहेत. त्यामुळे वाहतूक समस्या उद्भवत आहेत.

या सर्व वाहतूक समस्यांशी निगडित प्रश्नांबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या निर्देशानुसार पार पडलेल्या या बैठकीला पोलीस निरीक्षक शैलेश सणस, वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, अलिबाग नगर परिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आणि पत्रकार उपस्थित होते.

वाहतुकीशी निगडित विविध प्रश्नांबाबत संयुक्तपणे कारवाई करण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. शहरात लागणाऱ्या फळांच्या गाड्या तसेच भाजीवाले, फुलवाले, खाद्यपदार्थांच्या गाड्या यांना योग्य जागा उपलब्ध केली जाणार आहे. त्याचबरोबर शहरात पार्किंग झोन, ना फेरीवाला क्षेत्र, सम–विषम पार्किंग तयार केले जाणार आहे. याबाबत प्रशासन एकत्रित निर्णय घेऊन ही कारवाई करेल, असे बैठकीत सांगण्यात आले. अनधिकृत पार्किंगवर कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांना टोइंग वाहन उपलब्ध व्हावे, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

### ‘हे’ रस्ते अनधिकृत पार्किंगच्या जाळ्यात

**अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते महावीर चौक, महावीर चौक ते बालाजी नाका, जिल्हाधिकारी कार्यालय रस्ता, घरत आळी, बालाजी नाका ते मारुती नाका, पोस्ट ऑफिस ते समुद्र किनारा, सेंट मेरी शाळा रस्ता, कन्या शाळा रस्ता हे मुख्य रस्ते अनधिकृत पार्किंगच्या जाळ्यात अडकले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग काढून रस्ते वाहतुकीस मोकळे करण्यासाठी पोलीस आणि नगर परिषदे मार्फत कारवाईचा बडगा उचलला जाणार आहे.**



# लो. टिळकांच्या शिक्षणपद्धतीचा अवलंब केल्यास भारत महासत्ता बनेल

## प्रा. अविनाश मोरे यांचे प्रतिपादन; खोपोलीत ब्राह्मण सभेची अभिनव व्याख्यानमाला

**खोपोली : प्रतिनिधी**

लोकमान्य टिळकांनी शंभर वर्षांपूर्वी दाखवलेला राष्ट्रीय शिक्षणाचा मार्ग स्वीकारला तर भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करेल व त्याची आज देशाला गरज आहे, असे प्रतिपादन प्रख्यात व्याख्याते प्राध्यापक अविनाश मोरे यांनी खोपोली येथे केले.

ब्राह्मण सभा खोपोली या संस्थेच्या अभिनव व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफताना प्रा. अविनाश मोरे लोकमान्य टिळक या विषयावर बोलत होते. या वेळी त्यांनी लोकमान्य टिळकांचा संघर्षमय जीवनपट उभा केला.

ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरोधात लोकमान्य टिळकांनी भारतीयांना एकत्र करून त्यांनी जनआंदोलन उभे केले, असे प्रा. मोरे यांनी सांगितले.

संस्थेचे कार्यवाह अंबादास पाठक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रमुख पाहुणे पार्ले बिस्कीट कंपनीचे एचआर प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, माजी सैनिक निलेश जगताप, संस्थेचे अध्यक्ष अनिल रानडे, कोषाध्यक्ष सुधाकर भट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्ष सुनिती पाटणकर यांनी आभार मानले.



# नागोठण्यातील एकाची गळफास घेऊन आत्महत्या

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील रामनगर परिसरात राहणाऱ्या प्रकाश कृष्णा धोत्रे (वय ४५) याने रविवारी (दि. ३१) राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

नागोठणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार प्रकाश धोत्रे हा रामनगर येथे आपल्या घरात एकटाच राहत होता. तो अविवाहित असून त्याचे मानसिक संतुलन बिघडले होते. रविवारी सकाळी आपल्या राहत्या घरात दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. पुढील तपास हवालदार एस. आर. म्हात्रे करीत आहेत.


**सुचना**

**रा.स्व.संघ जनकल्याण समिती**

**डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रूग्णालय, पनवेल**

या संस्थेचे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या वर्षाचे IPD, OPD व Dialysis या विभागाचे रेकॉर्ड सरकारी नियमाप्रमाणे नष्ट करण्यात येणार आहे. तरी या संबंधित वर्षातील माहिती कोणास हवी असल्यास जाहिरात तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत रूग्णालयाशी संपर्क करावा. त्या नंतर सदर वर्षाची माहिती देण्यास रूग्णालय जबाबदार राहणार नाही.

**सही/–**
**डॉ. भक्ती सारंग**
**वैद्यकिय अधिक्षक**

रा.स्व.संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रूग्णालय, पनवेल १९६/१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पनवेल ४१०२०६. मोबाईल क्र. ९३२१६३६४९७



**उरण नगरपरिषद, उरण**

**निविदा सूचना**

जा.क्र.उनप/पा.पू./१७४०/२०२२–२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :– ०३/०८/२०२२

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामांकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १. | उरण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकरिता जनरेटर दुरुस्ती करणे व त्यास लागणारे इतर साहित्य पुरवठा करणे. | २०००/– | ५००/– |
| | उरण नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता विविध व्यासाचे जी.आय.सी.आय पाईप व त्यास लागणारे साहित्य पुरवठा करणे. | २०००/– | ५००/– |

**अटी/शर्ती :–**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक ०४/०८/२०२२ ते दिनांक १७/०८/२०२२ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०:०० ते सायं. ५:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक ०४/०८/२०२२ ते दिनांक १७/०८/२०२२ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोनस लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक १८/०८/२०२२ रोजीचे दुपारी ४:०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ५:०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/–**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**


# रोटरी क्लब रोहा सेंट्रलचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोटरी क्लब रोहा सेंट्रलचा पाचवा पदग्रहण सोहळा नियोजित प्रांतपाल मंजू फड़के यांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी डॉ. कैलाश जैन यांच्याकडून सुचित पाटील यांनी अध्यक्षपदाची सुत्रे स्वीकारली. सुचित पाटील यांनी येत्या वर्षभरात शैक्षणिक क्षेत्र व महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करण्याचा मनोदय व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या दिवकर यांनी केले. क्लबचे उपाध्यक्ष डॉ. प्रथमेश बुधे, सेक्रेटरी देवेंद्र चांदगावकर, खजिनदार विजय दिवकर, नितिन धमाले, राजेश राऊत, मयूर दिवेकर, कैलाश जैन, अजित तेलंगे, डॉ. देवेंद्र जाधव, गणेश सरदार, दीपक सिंग, रुपेश पाटील, संदेश कापसे, मनोज बोराणा, विकास जैन, रामचंद्र नाकती, परेश जैन, अविन शर्मा, लक्ष्मण मोरे, राकेश कागड़ा, राहुल जैन आदि उपस्थित होते.





**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. – २ व ३ करिता)**

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग याचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा क्रमांक/सी.सी/आर.जी.डी./११२/२०२१

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता: ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती
मंदिरा जवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

विरूध्द

१) श्री. शाहू बळीराम जाधव
पत्ता : माणिक नगर, बी – २०४, दुसरा मजला,
परदेशी आळी, पनवेल, ता.– पनवेल,
जि. – रायगड – ४१०२०६

२) सौ. छाया बळीराम बिराजदार,
पत्ता : कोणार्क प्लाझा, बंदर रोड, रूम नं. ३०३,
महाजनवाडी हॉल जवळ, पनवेल, ता.–पनवेल,
जि.–रायगड – ४१०२०६.

३) श्री. धर्मेंद्र दिनेश परदेशी
पत्ता : वाल्मिकी नगर, परदेशी आळी,
तालुका पोलिस स्टेशन जवळ, पनवेल ता.– पनवेल,
जि– रायगड – ४१०२०६. } प्रतिवादी

दावा रूपये – १,४२,९३८/–

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २०/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दि. १५/०७/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह पतसंस्था मर्या. अलिबाग कॅपस)
दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर
मु.पो.ता. अलिबाग जि. रायगड–४०२२०१

सोबत लवाद दावा पाने

सही/–
ज्युडिशियल क्लार्क
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

कोर्टाचा शिक्का



**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. – २ व ३ करिता)**

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग याचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा क्रमांक/सी.सी/आर.जी.डी./१११/२०२१

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता: ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती
मंदिरा जवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

विरूध्द

१) श्रीमती. मंगल शाहू जाधव
पत्ता : बी –विंग, ०३, रिध्दी सिध्दी सोसायटी,
सारस्वत बँक जवळ, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल
ता.–पनवेल, जि.–रायगड – ४१०२०६

२) श्री. प्रणव पतंगराव देशमुख,
पत्ता : घर नं. ३२१, दापोली, परशुराम पाटील
चाळ, उरण रोड, पो–पारगाव, ता.–पनवेल,
जि.–रायगड – ४१०२०६.

३) श्री. बळीराम केशव बीराजदार
पत्ता : संघमित्र बिल्डिंग, पायोनिअर सोसायटी,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल ता.– पनवेल,
जि.–रायगड – ४१०२०६. } प्रतिवादी

दावा रूपये – १,०९,८५३/–

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २०/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दि. १५/०७/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह पतसंस्था मर्या. अलिबाग कॅपस)
दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर
मु.पो.ता. अलिबाग जि. रायगड–४०२२०१

सोबत लवाद दावा पाने

सही/–
ज्युडिशियल क्लार्क
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

कोर्टाचा शिक्का



**जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. – १ करिता)**

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी,**
**मु. अलिबाग याचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा क्रमांक/सी.सी/आर.जी.डी./११०/२०२१

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
पत्ता: ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती
मंदिरा जवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

विरूध्द

आकांक्षा महिला बचत गट

१) श्रीमती जान्हवी गिरीष कदम –अध्यक्षा
पत्ता : रा. वावंढळ, पो.–वावंढळ, ता.–खालापूर,
जि.–रायगड – ४१०२०२

२) श्रीमती शुभदा राजेंद्र पारठे –सचिव
पत्ता : शिवाजी नगर, तूपगाव, पो.–चौक,
ता.–खालापूर, जि.–रायगड – ४१०२०२

३) श्रीमती. भारती बाळासाहेब देशमुख
पत्ता : पल्लवी कॉम्प्लेक्स, चौक मानिवली,
पो. चौक, ता.–खालापूर, जि.–रायगड – ४१०२०२

४) श्रीमती भारती निलेश सुर्वे,
पत्ता : तुपगाव, पो.– चौक, ता.–खालापूर,
जि.–रायगड – ४१०२०३ } प्रतिवादी

दावा रूपये – १,३३,४५७/–

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २०/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दि. १५/०७/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड–रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह पतसंस्था मर्या. अलिबाग कॅपस)
दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी.स्टॅड समोर
मु.पो.ता. अलिबाग जि. रायगड–४०२२०१

सोबत लवाद दावा पाने

सही/–
ज्युडिशियल क्लार्क
रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग
रायगड व रत्नागिरी जिल्हा

कोर्टाचा शिक्का

## निवडक

### पनवेलमधून रिक्षेची चोरी

**पनवेल :** शहरातील ठाणा नाका परिसरात उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. संदीपान केणी वय (वय २९) यांनी त्यांची ४० हजार रुपये किमतीची काळी पिवळी बजाज कंपनीची आटो रिक्षा (एमएच ४६ सी १८९१) ही कनक बिल्डिंगमधील रिद्धी ट्रेडर्स या दुकानासमोर उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञाताने ही रिक्षा चोरून नेल्याने या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मोहोपाड्यात आढळला मृतदेह

**मोहोपाडा :** मच्छीबाजाराजवळील बसथांब्यात एका ४९ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. याबाबत रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत मुन्ना छोटुमिया शेख (रा. तुपगाव, मुळ जे.जे.कॉलनी, बांद्रा मुंबई) यांस दारू पिण्याचे व्यसन असून तो मोहोपाडा बसस्टॉपमध्ये मृत अवस्थेत पडलेला होता. याबाबत त्याचा मुलगा चांद मुन्ना शेख (वय १९) याने पोलिसांना माहिती दिली. या वेळी रसायनी पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पाहणी करून मुन्ना शेख याचा मृतदेह चौक उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. याबाबत तपासिक अंमलदार सतिश नलावडे पुढील तपास करीत आहेत.

# नवी मुंबईत विद्यार्थी वाहतूक असुरक्षित

## आरटीओकडून ६० वाहनांवर दंडात्मक कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शालेय बस आणि व्हॅनमधून होणारी विद्यार्थ्यांची वाहतूक नवी मुंबईमध्ये सुरक्षित नसल्याचे 'आरटीओ'ने केलेल्या कारवाईत समोर आले आहे. २६ जुलैपासून विशेष मोहीम घेऊन ६० वाहनांवर कारवाई करून ८९ हजार दंड वसूल केला आहे. यात वेगमर्यादेच्या उल्लंघनासह क्षमतेपेक्षा अधिकची वाहतूक तसेच वाहनात अग्निशमन यंत्रणा नसल्याचे समोर आले आहे.

विद्यार्थी वाहतूक करणारी वाहने यासाठीच्या नियमांना बगल देत वाहतूक करीत आहेत. त्यामुळे शालेय वाहनांची तपासणी करण्याचे आदेश परिवहन आयुक्त कार्यालयाने नुकतेच दिले आहेत. त्यानुसार विद्यार्थी वाहतूक करणाऱ्यांवर उपप्रादेशिक विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे.



(संग्रहित छायाचित्र)

शाळा सुरू झाल्यानंतर आरटीओ व नवी मुंबई शिक्षण विभागाच्या वतीने या वाहनचालकांची एक बैठक घेत नियमावलीतील तरतुदीचे पालन करावे, विनापरवाना शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यात येऊ नये, अशा वाहनमालकांनी नियमावलीची पूर्तता करून विद्यार्थी वाहतुकीचे परवाने घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले होते, मात्र तरीही शहरात नियमांना पायदळी तुडवत विद्यार्थी वाहतूक होत आहे. त्यामुळे वाशी आरटीओने एक मोहीम हाती घेत या वाहनांचा वाहन परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, चालकाचा परवाना बॅच यांची तपासणी केले. यात नियमांचे पालन होत नसल्याचे दिसून आले.

क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी वाहतुकीचे प्रमाण अधिक होते. आशा एकूण ६० बसचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांना ८९ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे, अशी माहिती वाशी उपप्रादेशिक अधिकारी हेमांगी पाटील यांनी दिली.

### कागदपत्रांचाही अभाव

***बसमध्ये विद्यार्थ्यांसोबत महिला कर्मचारी असावा असा नियम आहे, परंतु नवी मुंबई शहरातील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या ६० टक्के वाहनांत महिला कर्मचारी उपस्थितीत नव्हत्या. यासोबतच वाहन परवाना आणि योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.***

## 'अण्णाभाऊ साठे हे युगप्रवर्तक साहित्यिक'

**नवी मुंबई : बातमीदार**

कष्टकरी श्रमजीवी सामान्य माणूस हा कथा-कादंब-यांचा नायक होऊ शकतो हे अण्णाभाऊ साठेंनी आपल्या लेखनातून दाखवून दिले. अशा प्रकारे तत्कालीन मराठी साहित्याचा केंद्रबिंदू बदलणारे ते युगप्रवर्तक साहित्यिक होते, असे सांगत साहित्यिक डॉ. प्रा. शरद गायकवाड यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास विविध प्रसंग, घटना, कथानके सांगत उलगडवला.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनाच्या पूर्वसंध्येला ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब अंबेडकर स्मारक सभागृहात 'विचारवेध' या कार्यक्रम शृंखले अंतर्गत सुप्रसिध्द साहित्यिक डॉ प्रा शरद गायकवाड यांनी 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे-जीवनप्रवास' या विषयावरील माहितीपूर्ण व्याख्यानातून अण्णा भाऊंची महानता विषद केली.

'गावकुसाबाहेरची बहुजनगाथा लिहिणारा आधुनिक तुकाराम' म्हणजे




हा तुकाराम भाऊराव साठे अर्थात अण्णा भाऊ साठे असल्याचे सांगत डॉ. शरद गायकवाड यांनी साहित्य म्हणजे परिवर्तनाचे शस्त्र म्हणून अण्णाभाऊंनी वापरले आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकारण्यासाठी उभे आयुष्य खर्ची घातले असे अनेक उदाहरणे देत मांडले.

केवळ दीड दिवसांची शाळा पाहिलेल्या अण्णा भाऊंच्या साहित्यकृतींचा अभ्यास आज देशातील नामांकित विद्यापिठातील विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी करताहेत, असे सांगत डॉ. शरद गायकवाड यांनी अण्णाभाऊंच्या पुस्तकांतून मानवी मूल्यांचे संरक्षण व संवर्धन होत असल्याचे उदाहरणे देत स्पष्ट केले. घामाची महती सांगणारी व श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी साहित्यनिर्मिती करीत अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यकृतीतून बाणेदार नायिका चितारली तसेच स्त्री-पुरुष समानता आणली असेही अनेक दाखले देत त्यांनी पटवून दिले.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या विशेष व्याख्यानामुळे अण्णाभाऊंना खऱ्या अर्थाने वैचारिक आदरांजली अर्पण करण्याचे भाग्य लाभले अशी भावना व्याख्याते डॉ. शरद गायकवाड यांनी व्यक्त केली. नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून अण्णाभाऊंच्या स्मृतीजागरात सहभाग घेतला.

## पनवेलमध्ये रविवारी गरजूंना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पनवेल महानगरपालिका हद्दीतील १० शाळांतील ७०० गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी यांनी दिली.

रविवार ७ ऑगस्ट २०२२ रोजी दुपारी २ वाजता श्री साईबाबा मंदिर पनवेल येथे या शैक्षणिक साहित्याचे वाटप होणार आहे. यामध्ये पनवेल शहर, कोळेश्वर विद्या मंदिर, मोठा खांदा, धाकटा खांदा, तक्का, पोदी, गुजराती, उर्दू शाळांचा समावेश आहे.

या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख उपस्थित राहणार आहेत. या वेळी १० शाळांतील सुमारे १०० शिक्षकांचाही सन्मान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे या शिक्षकांना शिर्डी यात्रेचेही आयोजन श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे, अशी माहिती श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे सेक्रेटरी रामलाल चौधरी, उपाध्यक्ष राम थदानी यांनी दिली.

## कचरा वेळेवर उचलावा; भाजपची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली नोडमध्ये गेल्या अनेक दिवसापासून रस्त्यावर कचरा पडून आहे, तो लवकरात लवकर उचलावा, अशी मागणी भाजप नवी मुंबई महामंत्री कृष्णा पाटील यांनी केली आहे.

गेल्या अनेक दिवसापासून घणसोली नोडमध्ये घंटागाडी वेळेवर येत नसल्यामुळे येथील रहिवासी कचरा रस्त्यावर टाकत असल्याने नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. घणसोली नोंडमधील संबंधित अधिकाऱ्यांना कृष्णा पाटील यांनी अनेक तक्रारी करूनदेखील त्यांनी काहीही उपाययोजना केली नाही. यावरून अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार चालू आहे, असा आरोप नागरिक करत आहेत.

स्वच्छ भारत अभियानात प्रशासन गतिमान होते, मात्र त्यानंतर घनकचरा विभागाने स्वच्छतेबाबत दुर्लक्ष केले आहे. घंटागाडी वेळेवर येत नसल्याने कचऱ्याचे ढीग रस्त्यावर जमा झाल्याचे दिसते. प्रशासनाचा मनमानी कारभार थांबला नाही तर १० तारखेनंतर रस्त्यावर पडलेला कचरा, विभाग



अधिकाऱ्यांच्या दालनात नेऊन टाकून जन आंदोलन उभे करूअसा इशारा महामंत्री कृष्णा पाटील यांनी मनपास दिला आहे. याबाबत उपायुक्त (घनकचरा विभाग) बाबासाहेब राजळे यांना विचारले असता घंटागाडी संदर्भात त्वरित सूचना देतो, असे सांगितले.

## फुंडे हायस्कूलमध्ये नागपंचमीनिमित्त व्याख्यान

**उरण : बातमीदार**

श्रावण महिना म्हणजे मराठमोळ्या सणांची रेलचेल असते. त्यातील अगदी पहिला सण म्हणजे नागपंचमी! रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २) नागपंचमी सण आनंदाने साजरा करण्यात आला.

इयत्ता नववी 'ब'च्या वर्गाने या कार्यक्रमाची छान तयारी केली होती. विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्या सुनिता वर्तक, पर्यवेक्षक श्री. गोडगे, एस. जी. म्हात्रे आणि नववी 'ब'च्या वर्गशिक्षिका के. जी. म्हात्रे आणि शिक्षिका वृंदाच्या हस्ते नागोबाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. नववी 'ब'च्या विद्यार्थिनींनी नागपंचमी सणाचे महत्व आपल्या भाषणातून विशद केले.

यानंतर नागपंचमी कार्यक्रमानिमित्त विद्यालयात केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, महाराष्ट्र भूषण, सर्पमित्र राजू मुंबईकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सर्पमित्र राजू मुंबईकर यांनी सर्पविज्ञान, सापबद्दल समज




आणि गैरसमज, अंधश्रद्धा याविषयी अत्यंत उपयुक्त माहिती विद्यार्थ्यांना दिली. विषारी आणि बिन विषारी सापांची फ्लेक्स फोटोद्वारे ओळख करून दिली, तसेच प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधत खऱ्या अर्थाने त्यांना सर्पविज्ञान समजावून सांगितले.

या वेळी त्यांचे सहकारी कुणाल वास्कर, साजन वास्कर तसेच वनविभाग अधिकारी एस. बी. इंगोले, आर. एस. पवार, श्री. डी. एन. दिविलकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी केले होते, तसेच या दिवशी सोनारी गावच्या सरपंच पूनम कडू यांचेकडून विद्यालयास वृक्ष रोपे आणि फुलझाडे भेट म्हणून देण्यात आली.

## नवी मुंबईत शैक्षणिक साहित्याचे वाटप

### आरीन फाउंडेशन व अपंग संजीवनी नवजीवन कल्याणकारी संस्थेचा उपक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आरीन फाउंडेशन आणि अपंग संजीवनी नवजीवन कल्याणकारी संस्था दिवा महाराष्ट्र यांचे संयुक्त विद्यमाने आर्थिकदृष्ट्या गरीब, गरजू, दीन, दुबळे, दिव्यांग, विधवा, निराधार यांच्या उत्कर्षासाठी सामाजिक उपक्रम राबविले जातात. या सामाजिक उपक्रमाचा एक रविवार शिव मंदिर, कांदा बटाटा मार्केट, सेक्टर १८, तुर्भे-वाशी, नवी मुंबई येथे आर्थिकदृष्ट्या गरीब, अनाथ, दिव्यांग, विकलांग, गरजू माथाडी कामगारांचे मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम झाला.

या वेळी १०० गरीब आणि गरजू माथाडी कामगारांच्या पहिली ते दहावीच्या विद्यार्थांना शैक्षणिक किट ज्यामध्ये स्कूल बॅग, सहा वह्या, नोट बुक, सहा



पेन, तीन शिस्पेंसिल, खोडरबर, कंपोस पेटी इत्यादी उपयुक्त साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात आरीन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नितेश मिसाळ, प्रकल्प अधिकारी किरण जाधव, अपंग संजीवनी नवजीवन कल्याणकारी संस्था दिवा संस्थापक अध्यक्ष सुरेश दुधाने, संस्थेचे हितचिंतक दिगंबर मोरडे, सुधीर बिरादार, पांडुरंग पाटील यांनी उपस्थित राहून शैक्षणिक साहित्य वाटप केले.

## सुप्रिया कांबळे ठरल्या 'श्रावण सम्राज्ञी'

**पनवेल : वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित रायगड श्रावण सम्राज्ञी २०२२ स्पर्धेचे आयोजन बेलेझा बँक्वेट हॉल, खांदा कॉलनी याठिकाणी आयोजन करण्यात आले होते. अंतिम १३ स्पर्धाकांमध्ये ही स्पर्धा झाली. या वेळी स्पर्धेच्या विजेत्या ठरल्या सुप्रिया कांबळे तर पहिला उपविजेता स्वरा पाटकर व दुसऱ्या उपविजेता दिक्षा ढोणे ठरल्या आहेत.

आर. के. ग्रुपचे राजेंद्र कोळकर व महाराष्ट्र श्री २०२० ठरलेल्या श्रद्धा ढोके कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मान्यवरांनी दिशा व्यासपीठाच कौतुक करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच हर्षला योगेश तांबोळी व राहुल इंगळे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून उत्तमरित्या काम पहिले. या स्पर्धेच्या ग्रुमिंग एक्स्पर्ट होत्या श्रीजिता बॅनर्जी. दर आठ मिनिटाला कॅन्सरमुळे एक महिला दगावली जाते कॅन्सर विषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने कार्यक्रमातून मॅसेज देण्यात आला व विनस वूमन्स



हॉस्पिटलच्या डॉ. सुवर्णा चोपडे व डॉ. श्वेता भालेराव यांनी कॅन्सर विषयी माहिती दिली, तसेच दिशा व्यासपीठामार्फत हॉस्पिटल मध्ये नोंदणी झालेल्या महिलेस मुलगी झाल्यास तिच्या अकाउंटवर पाच हजार रुपये टाकण्याचे आश्वासन दिले.

याचबरोबर डॉ. रजत जाधव हीलिंग टच आय हॉस्पिटल यांजकडून तीन मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत व डॉ. श्रुणाल जाधव यांजकडून दोन होमिओपॅथी ट्रीटमेंट मोफत करण्याचेही आश्वासन यावेळी व्यासपीठावर दिले. व्हेनु पार्टनर बेलेझा बँक्वेट हॉल, आर के ग्रुप मातोश्री हॉस्पिटल, अथर्व डेंटल क्लीनिक व गिफ्ट पार्टनर मीना इलेमेंट्स, दामजी गणपत गोवारी हायस्कूल, अस्मिता ब्युटी पार्लर, माजी नगरससेवक विजय चिपळेकर व जयेश लोखंडे यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.

कार्यक्रमास सूरदास गोवारी, कामोठे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव, ऐश्वर्या मोहिते, दिलीप कोरडे उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती व संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी केले व उपस्थितांचे आभार खुशी सावर्डेकर यांनी मानले. महिलांसाठी खुले व्यासपीठ व जनजागृतीपर उपक्रम नेहमीच व्यासपीठामार्फत राबवले जातील, असे संस्थापक निलम आंधळे यांनी या वेळी सांगितले.




## द्रोणागिरी किल्ल्यावर दुर्गसंवर्धन मोहीम

**उरण : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर त्यांचे विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणाऱ्या, गडकिल्ल्यांचे संवर्धन, संरक्षण करणाऱ्या सहयाद्री प्रतिष्ठान या संघटनेतर्फे उरण तालुक्यातील द्रोणागिरी किल्ल्यावर दुर्गसंवर्धन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी सह्याद्री प्रतिष्ठान उरण विभागाचे पदाधिकारी सदस्यांनी एकत्र येत द्रोणागिरी किल्ल्यावर साफ सफाई केली. विशेष म्हणजे सहा वर्षांच्या साई गोवारी या चिमुकल्याने न दमता, न घाबरता गड चढला व गडावरील प्लास्टिक कचरा जमा केला. एकंदरीतच दुर्गसंवर्धन मोहीम मोठ्या उत्साहात झाले. सह्याद्री प्रतिष्ठान ही संघटना गड किल्ल्यांचे संवर्धन संरक्षण करणारी संघटना असून सह्याद्री प्रतिष्ठानने राबविलेल्या दुर्गसंवर्धन मोहिमेचे सर्वत्र कौतूक होत आहे.

महाराष्ट्राला गडकिल्ल्यांचा फार मोठा इतिहास लाभला आहे. मात्र हे गडकिल्ले दुर्लक्षित होऊ नयेत, त्या जागेचे, किल्ल्याच्या इतिहासाचे महत्त्व कमी होऊ नये यासाठी त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर सह्याद्री प्रतिष्ठानने द्रोणागिरी किल्ल्यावर दुर्गसंवर्धन मोहिमेचे आयोजन केले होते.




# रायगडातील स्मारकांवर फडकणार तिरंगा

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अभियानाची पूर्वतयारी सुरू

**नागोठणे : प्रतिनिधी**

**भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर तिरंगा' ची घोषणा केली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यामधील १३ पुतळे व स्मारकांवर तिरंगा फडकवला जाणार आहे. यामध्ये रायगड किल्ला, चवदार तळे, चिरनेर इत्यादी स्थळांचा समावेश असून, या निमित्ताने सर्व पुतळे आणि स्मारकांना नवी झळाळी प्राप्त होणार आहे.**









स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त हर घर तिरंगा या मोहिमेंतर्गत १३ ते १५ ऑगस्टदरम्यान प्रत्येक घरात तिरंगा फडकवण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायत, तहसील कार्यालये सज्ज झाली असून तेथे ध्वज विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी तिरंगा झेंडा संहितेचे पालन करावे. हर घर तिरंगा या उपक्रमांर्गत लावण्यात आलेले झेंडे अभियान कालावधीनंतर प्रत्येकाने सन्मानाने व सुरक्षित ठेवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड ही क्रांतिकारकांची भूमी असून त्यांच्या क्रांतीची साक्ष देणारी अनेक स्मारके जिल्ह्यात प्रेरणा देत उभी आहेत. या सर्व स्मारकांवर राष्ट्रध्वज फडकावण्यात येणार आहे. यासाठी स्थानिक प्रशासनाने स्मारकांची साफसफाई, रंगरंगोटी सुरू केली आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रमुख स्मारकांमध्ये रायगड किल्ला (ता. महाड), चवदार तळे (ता. महाड), आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके (शिरढोण, ता. पनवेल), हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील (मनिवली, ता. कर्जत), सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे (उमरठ, ता. पोलादपूर), सरखेल कान्होजी आंग्रे (अलिबाग), हुतात्मा स्मारक (चिरनेर), जंगल सत्याग्रह (चिरनेर, ता. उरण), आचार्य विनोबा भावे (गागोदे बुद्रुक, ता. पेण), समरभूमी उंबर खिंड (चावणी, ता. खालापूर) ही स्मारके तसेच आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, हुतात्मा हिराजी पाटील, सुभेदार नरवीर तानाजी मालुसरे, सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या पुतळ्यांचा समावेश आहे.

**भारताच्या स्वातंत्र्य दिनाला या १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशभरात साजरा करण्यात येत आहे. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या अंतर्गत आपण रायगड जिल्ह्यातील प्रमुख पुतळे आणि स्मारकांवर तिरंगा फडकणार आहोत. त्या ठिकाणी पूर्वतयारी सुरू केली आहे.**

**–डॉ.महेंद्र कल्याणकार, जिल्हाधिकारी, रायगड**





## महाडमध्ये धावत्या एसटी बसचे चाक निखळले

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावरील केंबुर्ली (ता. महाड) गावाच्या हद्दीत एका वळणावर बुधवारी (दि. ३) सकाळी धावत्या एसटी बसची मागील दोन्ही चाके निखळली. त्यामुळे बस रस्त्याच्या कडेला घसरली. या बसचा मोठा अपघात होता होता वाचला आणि बसमधील ४० प्रवासी सुदैवाने बचावले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये एसटी महामंडळाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

**सुदैवाने ४० प्रवासी बचावले**

मंडणगड एसटी आगाराची तिडे–मंडणगड–नालासोपारा ही बस (एमएच–१४,बीटी–२५८३) महाड आगारातून बुधवारी सकाळी १०वाजता मुंबईकडे जाण्यास रवाना झाली. तालुक्यातील केंबुर्ली गावाच्या हद्दीतील एका वळणावर चालू अवस्थेत असलेल्या या बसच्या एक्सेलसह दोन्ही चाके निघून गेली आणि बस काही अंतर घसरत गेली. या बसमध्ये ४०प्रवासी होते. सुदैवाने ते सर्व प्रवासी बचावले. या घटनेने एसटी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## मुरूडमध्ये विजेचा शॉक लागून म्हशीचा मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील कोटेश्वरी मंदिर परिसरात जीवंत वीजवाहिनी अंगावर पडून एका म्हशीचा जागीच मृत्यू झाला.

मुरूड पोलीस ठाण्याच्या वरच्या भागात राहणारे खालिद ऐनुल्ला यांची म्हैस कोटेश्वरी मंदिर परिसरात चरावयास गेली होती. त्यावेळी महावितरणची एक जीवंत वीजवाहिनी अंगावर पडल्याने या म्हशीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेचे वृत्त समजताच महावितरणचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी पोचले. त्यांनी वीजवाहिनीची दुरुस्ती केली. दरम्यान, महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे आपल्या म्हशीचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे आपल्याला नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी खालिद ऐनुल्ला यांनी केली आहे.

**म्हशीचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त होताच नुकसान भरपाई मिळण्यासाठीचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठविला जाईल.**

**–महादेव दातीर, उपमुख्य कार्यकारी, महावितरण मुरूड**

## आत्महत्या करण्यास निघालेल्या व्यक्तीला माणगाव पोलिसांनी वाचविले

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेखाली आत्महत्या करण्यास निघालेल्या इसमास माणगाव पोलिसांनी आत्महत्या करण्यापासून परावृत्त करुन त्याला त्याच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केले.

माणगाव पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि. २) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाचा फोन आला. त्याने सांगितले की, इंदापूर गावाच्या हद्दीत रेल्वे ट्रॅकवर एक इसम झोपला आहे आणि आत्महत्या करायची आहे असे सांगत आहे. सदर घटनेची खात्री करण्याकरिता उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील यांच्यासह माणगाव पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांना एक इसम रेल्वे ट्रॅकवर झोपलेला आढळला.अधिक चौकशीत त्याने आपले नाव विजय महादेव शिगवण (वय ४७, रा. घोटवळ, ता. माणगाव) सांगितले.

माणगाव पोलिसांनी घोटवळ गावचे पोलीस पाटील सुनील गोपाळ सावंत यांना फोन करून घटना स्थळी बोलावून घेतले तसेच सदर इसमास त्याच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

## नेहमी उच्च ध्येय ठेवा -ॲड. नीला तुळपुळे

### कोलाड येथील धर्माधिकारी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

अपयशाने घाबरून न जाता यश कसे पदरात पाडून घेता येईल, याविषयी नेहमी प्रयत्न करा. नेहमी आपले ध्येय्य उच्च ठेवा आणि त्या ध्येय्यापर्यंत जाण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ॲड. नीला तुळपुळे यांनी कोलाड येथे विद्यार्थ्यांना केले.



रोहा तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग आणि लायन्स क्लब रोहा व कोलाड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'अपयशाला सामोरे कसे जावे?' याविषयी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. नीला तुळपुळे बोलत होत्या. विद्यार्थ्यांची वृत्ती नेहमी लढाऊ असावी, त्यांनी नेहमी प्रयत्नवादी राहिले पाहिजे, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

लायन्स क्लबचे पराग फुकणे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. प्रणिता सिंग यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, प्रा. सतीश सावळे, रवींद्र लोखंडे, डॉ. श्याम लोखंडे, अनिल महाडिक, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. नेहल प्रधान, प्रा. अनिरुद्ध मोरे, प्रा. जयवंती अडलीकर यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. प्रा. सूर्यकांत आमलपुरे यांनी आभार मानले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.


## पेणच्या सुबक गणेशमूर्ती विक्रीसाठी माणगावात दाखल



**माणगाव : प्रतिनिधी**

येत्या ३१ऑगस्ट रोजी गणरायाचे आगमन होत असून त्यांच्या स्वागतासाठी माणगावकर सज्ज झाले आहेत. पेणच्या सुबक गणेश मूर्ती विक्रीसाठी माणगावात आल्या असून, येथील बाजारपेठ सजावटीच्या विविध साहित्यांनी फुलली आहे.

गणेशोत्सव हा कोकणातील सर्वात मोठा उत्सव समजला जातो. गेली दोन वर्षे या उत्सवावर कोरोनाचे सावट होते. मात्र या वेळी सर्व निर्बंध उठविण्यात आल्याने गणेशभक्तांत प्रचंड उत्साह दिसून येत आहे. माणगाव बाजारपेठेत निलेश रातवडकर यांनी पेणच्या सुबक गणेश मूर्ती विक्रीसाठी ठेवल्या आहेत. थर्माकोलची आकर्षक मखरे, प्लॉस्टिकची फुले, विजेची तोरणे यांनी बाजारपेठ फुलली आहे. खरेदीसाठी गणेशभक्तांची लगबग सुरु झाली असल्याचे दिसत आहे.



## चांदई येथील नवीन पुलाचे बांधकाम प्रगतिपथावर

**कर्जत : बातमीदार**

उल्हास नदीवरील चांदई (ता. कर्जत) येथील जुन्या पुलाच्या बाजूला साडेचार कोटी रुपये खर्चून नवीन पूल बांधण्यात येणार आहे. या नवीन पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.

चिंचवली–कडाव–तांबस या रस्त्यावर चांधई गावाजवळील उल्हास नदीवरील जुना पूल अरुंद आहे. तेथे नवीन पूल बांधण्याची मागणी अनेक वर्षे केली जात होती. या जुन्या पुल–शेजारीच नवीन पूल बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभा–गाकडून मंजूर करण्यात आले आहे. सध्या पावसाळा असूनही नवीन पुलाचे सर्व पिलर उभे राहिले असून स्लॅब टाकण्या–चे काम पूर्ण केल्यास या वर्षे अखेरीस पुलावरून वाहतूक सुरु होऊ शकते.

## उमरोलीतील जळालेले रोहित्र बदलले; वीजपुरवठा पूर्ववत

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील उमरोली गावातील विजेचे रोहित्र २९ जुलै रोजी सायंकाळी जळाले. तेंव्हापासून तेथील ग्रामस्थ अंधारात होते. त्याबद्दल मनसेने पाठपुरावा केल्यानंतर नवीन वीज रोहीत्र बसविण्यात आले. त्यानंतर उमरोली गावाचा वीजपुरवठा तीन दिवसांनी पुन्हा सुरू झाला.



महावितरणचा उमरोली गावातील रोहीत्र २९ जुलै रोजी सायंकाळी जाळले. त्यामुळे ग्रामस्थ अंधारात असल्याने मनसेच्या कार्यकर्त्यांनी महावितरणचे कर्जत येथील सहाय्यक अभियंता प्रकाश देवके यांच्याशी संपर्क साधून वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. देवके यांनी महावितरण कर्मचारी हनुमंत कागे, कैलास कुंभारकर, नारायण साखरकर, रामू टेकम आणि स्थानिक रहिवासी यांच्या मदतीने पनवेल येथून नवीन रोहीत्र आणून उमरोली गावात बसविला. त्यामुळे गावाचा वीजपुरवठा पुन्हा सुरु झाला.

## खालापुरात विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षण मार्गदर्शन

**खालापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या मनातील लैंगिक प्रश्न व शंकांना व्यक्त होण्यासाठी व माहिती जाणून घेण्यासाठी सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने खालापूर पंचायत समिती सभागृहात नुकताच एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यात स्वामी विवेकानंद विद्या मंदिरमधील विद्यार्थ्यांना डॉ. सुभाष कटकदौंड व डॉ. विशाखा पवार यांनी काही निवडक व्हिडिओच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी लैंगिक शिक्षणं ही काळाची गरज असल्याचे मत या वेळी खालापुरचे गटविकास अधिकारी बालाजी पुरी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकी भालेराव यांनी केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रायगड जिल्हाध्यक्ष यशवंत गायकवाड, खालापूर तालुका विविध उपक्रम प्रमुख दयानंद पोळ या वेळी उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद विद्या मंदिरच्या मुख्याध्यापिका वसुधा म्हात्रे, सतीश राणे, श्रीकांत कोकणी, सागर माळी, प्रतिभा मंडावळे, प्रविणा पवार, सहजसेवा फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. शेखर जांभळे, कार्याध्यक्षा माधुरी गुजराथी, उपाध्यक्षा इशिका शेलार, सचिव वर्षा मोरे, खजिनदार संतोष गायकर, जनसंपर्क प्रमुख जयश्री कुलकर्णी, महिला संघटक नीलम पाटील, प्रथमेश पाटील, अजय कांबळे यांनी या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.





## नागोठण्यात सापांविषयी जनजागृती

**नागोठणे : प्रतिनिधी**

कोएसोच्या नागोठणे येथील आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मंगळवारी (दि. २) नागपंचमीचे औचित्य साधून सापाविषयी जनजागृती करण्यात आली. या वेळी सर्पमित्र व वन्यजीव रक्षक सागर दहिंबेकर यांनी सापांची उत्पत्ती, विषारी, बिनविषारी साप या विषयी माहिती देऊन पॉवर पॉईंटच्या माध्यमातून मार्गदर्शन केले केले.



मण्यार, घोणस, नाग, फुरसा, सपडा या विषारी आणि धामण, तस्कर, कौड्या, अजगर, डुलक्या घोणस इत्यादि बिनविषारी सापांची या वेळी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ. संदेश गुरव यांनी सजीव सृष्टीतील अन्न साखळी विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. नागोठण्याचे वनपाल अरुण धुमाळ व त्यांचे सहकारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सानिका पोळेकर हिने सूत्रसंचालन केले. डॉ. विकास शिंदे, सर्पमित्र निलेश लोखंडे, स्वेता विश्वकर्मा, निलेश जाधव, संदेश यादव, मोहित मुंडे, सनद खांडेकर यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे ७० स्वंयसेवक या कार्यक्रमास उपस्थित होते. कुणाल खांडेकर याने आभार मानले. प्रा. डॉ. दिनेश भगत, प्रा. चैत्राली पाटील, प्रा. पूनम जोशी, प्रा. प्रतीक्षा म्हात्रे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# तिसऱ्या टी-२०मध्ये भारताची सरशी

## विंडीजवर सात गडी राखून विजय



**सेंट किट्स : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यात पाच सामन्यांची टी-२० मालिका सुरू आहे. या मालिकेतील तिसरा सामना मंगळवारी (दि. २) सेंट किट्समधील बॅस्टेअर वॉर्नर पार्क येथे झाला. श्रेयस अय्यरच्या अर्धशतकाच्या बळावर भारताने हा सामना सात गडी राखून जिंकला आहे. त्यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत भारताकडे २-१ अशी आघाडी घेतली आहे.

वेस्ट इंडीजने भारताला १६५ धावांचे लक्ष्य दिले होते. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या भारतीय सलामीवीरांनी सावध सुरुवात केली, मात्र कर्णधार रोहित शर्माला दुखापतीच्या कारणास्तव सामन्यातून बाहेर जावे लागले. त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि श्रेयस अय्यर यांनी डावाला आकार दिला. दोघांमध्ये ८६ धावांची भागीदारी झाली. या दरम्यान, सूर्यकुमार यादवने ४४ चेंडूत ७६ धावा फटकावल्या. ऋषभ पंतने नाबाद ३३ धावा केल्या आणि १९व्या षटकामध्येच विजयावर शिक्कामोर्तब केले.

या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे वेस्ट इंडीजला प्रथम फलंदाजीसाठी उतरावे लागेल. यजमानांनी प्रथम फलंदाजी करताना पाच गडी गमावून १६४ धावा केल्या. सलामीवीर कायले मेयर्सने ५० चेंडूत ७३ धावा केल्या. त्यामध्ये आठ चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. त्यानंतर कर्णधार निकोलस पूरनने २२, शिमरॉन हेटमायरने २० तर रोव्हमन पॉवेलने २३ धावांचे योगदान दिले होते. भारताच्यावतीने भुवनेश्वर कुमारने दोन तर अर्शदीप सिंग आणि हार्दिक पंड्याने प्रत्येकी एक बळी घेतला होता.

भारताने पहिला टी २० सामना ६८ धावांनी जिंकला होता, तर दुसऱ्या सामन्यामध्ये पाच गडी राखून पराभव स्वीकारावा लागला होता. मालिकेतील शेवटचे दोन सामने फ्लोरिडामध्ये होणार आहेत.

# भारतीय ब संघाचा सलग पाचवा विजय






**चेन्नई : वृत्तसंस्था**

युवा भारतीय ग्रँडमास्टर डी. गुकेशने ४४व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या पाचव्या फेरीत अॅलेक्सी शिरॉव्हवर विजयाची नोंद केली. या बळावर भारत-ब संघाने मंगळवारी (दि. २) खुल्या गटात स्पेनला २.५-१.५ असे नामोहरम केले. त्यांच्या या विजयामुळे देशभरात जल्लोश साजरा करण्यात आला.

बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा चेन्नईमध्ये सुरू आहे. अप्रतिम रणनीतीमुळे ग्रँडमास्टर गुकेशने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सलग पाचव्या विजयाची नोंद करताना भारत-ब संघाच्याही सलग पाचव्या विजयात महत्त्वाचे योगदान दिले. या विजयानिशी गुकेशने लाइव्ह रेटिंगमध्ये विदित गुजरातीला मागे टाकले.

बी. अधिबानने ही दिमाखदार कामगिरी करताना ग्रँडमास्टर एड्युडरे इटूरिझगाला हरवले. निहाल सरिनने अँटन गुइजरला बरोबरीत रोखले, परंतु आर. प्रज्ञानंदने सांतोस लॅटासाकडून पराभव पत्करला. याचप्रमाणे भारत-अ आणि भारत-क संघांनी अनुक्रमे रोमानिया आणि चिली संघांवर २.५-१.५ अशा फरकाने विजय मिळवले.

महिला गटात भारत-अ संघाच्या सलग पाचव्या विजयात पुन्हा तानिया सचदेवने चमकदार विजयी कामगिरी केली. या संघाने फ्रान्सला २.५-१.५ असे हरवले. कोनेरू हम्पी, हरिका द्रोणावल्ली आणि आर. वैशाली यांनी आपापल्या लढतीत बरोबरीत सोडवल्या. भारत-ब संघाने जॉर्जियाकडून ०-३ अशा फरकाने पराभव पत्करला, तर भारत-क संघाने ब्राझिलशी २-२ अशी बरोबरी साधली.





**पनवेल : शहरातील बंदर रोड येथील रायगड स्पोर्ट्सच्या वतीने स्वातंत्र्य चषक ही दोनदिवसीय रबर बॉल क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या उपस्थितीत मंगळवारी झाला. या स्पर्धेतील प्रथम विजेत्याला ३० हजार व द्वितीय विजेत्याला १५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या वेळी प्रशांत कर्पे, शावेज रिजवी, नीरास सय्यद, सुफीयान पटेल, राजुभाई पटेल, वसीम मस्ते, नबीन शेख आदी उपस्थित होते.**

# वेटलिफ्टिंगमध्ये विकास ठाकूरला रौप्यपदक

**बर्मिंगहम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहममध्ये सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय वेटलिफ्टिंग खेळाडूंनी आपला दबदबा निर्माण केला आहे. स्पर्धेच्या पाचव्या दिवशी भारतीय वेटलिफ्टिंगपटू विकास ठाकूरने ९६ किलो वजनी गटात रौप्य पदकाची कमाई केली आहे. हे भारताचे एकूण १२वे तर वेटलिफ्टिंगमधील आठवे पदक ठरले आहे.

विकासने स्नॅच फेरीत १५५ किलो आणि क्लीन अँड जर्क फेरीमध्ये १९१ किलो वजन उचलले. अशा प्रकारे त्याने एकूण ३४६ किलो वजन उचलून रौप्यपदक जिंकले. सामोआचा वेटलिफ्टिंगपटू डॉन ओपालॉग विकासच्या पुढे होता. त्याने एकूण ३८१ किलो वजन उचलले. या वजनासह ओपलॉगने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत विक्रमही केला. मीराबाई चानू, जेरेमी लालरिन्नुगा आणि अचिंत शेउली यांनी स्वर्ण, संकेत महादेव सरगर, बिंदियारानी देवी आणि विकास ठाकुर यांनी रौप्य तर गुरुराजा ठाकुर आणि हरजिंदर कौर यांनी कांस्यपदक पटकावले आहे.

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com